तव नामाचा विसर न व्हावा
हीच प्रार्थना करुनी आता
साष्टांग नमितो साईनाथा॥८॥

-श्री. माधव द. निगळे पालघर, ठाणे-

## ईश्वरे वरदान। दिल्हे मज

एका सच्च्या ईश्वरभक्ताची दृष्टी अधु झाली व त्यास बहिरेपण आले, तेव्हा ईश्वर-चिंतनात रमताना त्याला स्फुरलेले काव्य:

बरे झाले देवा। श्रवण शक्ति गेली।
अनायासे झाली। मौन प्राप्ति॥१॥

दृष्टी अधु झाली। लाभाचीच गोष्ट।
पहाणे अनिष्ट। उरले नाही॥२॥

ऐकणे बोलणे। वाईट साईट।
न करिता कष्ट। दूर झाले॥३॥

दृष्टी अधुपण। आणि बहिरेपण।
ईश्वरे वरदान। दिल्हे मज॥४॥

## आर्तसाद!

आर्त स्वरातली साद
विनंती करिते मोहना!
विसंगतीच्या ह्या व्यथा
व्याकुळती मन्मना!

क्षणक्षण सावध मी
कधी येशील अंगणा?
रज तुझ्या चरणीची
होईन का मी सांग ना?

वाट किती पाहू रे
आधीच जाहला उशीर
पडेल कधी का विसर रे
गात्रे होता ही बधीर?

- सौ. मानसी मा. केसकर पंढरपुर, सोलापूर.

— ◆ —

## साई तुझी सोबत होती

मला किती लोक नडले वाट चालतांना
साई तुझी सोबत होती माझ्या पावलांना!
भेटलेले जीवनी अवघे
उगाच जळती...
जिथे तिथे मला सारे
गावात छळती...
तरीही पुरून उरतो हाय लबाडांना
साई तुझी सोबत होती माझ्या पावलांना!
कसे हे कर्तव्य माझे
डोळ्यात सलते...
स्वजनही बनती अता
होऊनिही चुलते...
फिकीर ना कधीही प्रगती साधतांना
साई तुझी सोबत होती माझ्या पावलांना
जे जे नडले त्यांना इथे
गाडीनऽऽसमूळ...
मग जो तो लक्षात ठेवील
माझी जातकूळ...
देतील दाद सारे माझ्या पराक्रमांना
साई तुझी सोबत होती माझ्या पावलांना!

- श्री. रमेश डी. चव्हाण नवापूर, धुळे.

# साई महिमा

श्री साई! तुझ्या नावाचा
विजयोत्सव सदा होऊ दे;
तुझ्या वात्सल्यपूर्ण नेत्रामधून
माया-ममता पाझरु दे॥१॥

श्री साई! शिर्डी पथावर
मखमली हिरवळ राहू दे,
भक्ती-भावाची निर्मळगंगा
सुखाच्या पात्रातून वाहूं दे॥२॥


श्री साई! द्वारकामाईत
शक्ती, शांती, मुक्ती असू दे
तुझ्या स्मरणमालेतून
नित्य मनोविजय पाहू दे॥३॥

श्री साई! तुझ्या दरबारात
अमीर फकीर एकत्र नांदू दे
परि साऱ्यांचा मालिक अल्ला
साई! तूच एकला असू दे॥४॥

श्री साई! तुझ्या मंदिरात
ममता, समता नि एकता फुलूं दे
भक्ति भावनेच्या ज्योतीने
बंधुभावाची स्वप्ने उमलूं दे॥५॥

श्री साई! तुझ्याच नावात
आम्हा सर्वांना स्वत:ला विसरु दे
तुझा महिमा अगाध अनंत
गात ओठी गीत बहरू दे॥६॥

- सौ. भावना दा. जेऊरकर
डोंबिवली, ठाणे.



# भाव-समर्पण - १

नाही आणिले धूप अन् चंदन, नाही वाहिले एकही सुमन
एकरूप एकाग्र होवुनी एक पूजिले मी तव चरण।।धृ.११

पहुडलो जेव्हा द्वारकामाई
स्वप्नीहि माझ्या मी तुज पाही
आशीष होता तुझाच साई
एकच केले मी तव स्मरण
एकरूप एकाग्र..... ।।१।।

पारायण कधी केले थोडे
कधी गाईले गीत पवाडे
समजुन घे हे शब्द वाकुडे
शबरीसम हे भाव समर्पण
एकरूप एकाग्र..... ।।२।।

स्वत्व जाळिले धुनीत सारे
ऐहिकाचे वृथा पसारे
देह जळता उरती निखारे
म्हणुन वाहिले चरणी तन मन
एकरूप एकाग्र..... ।।३।।

श्रद्धा सबुरी अमोल ठेवा
मानवसेवा ही प्रभू सेवा
नको कुणाचा कधीच हेवा
तव बोलाचे करितो पालन
एकरूप एकाग्र..... ।।४।।

# याचना - २

तूच गे माऊली। कृपेची साऊली।
मनाची बाहुली। कासावीस।।

तूच साईनाथा। तार मज आता।
तुजविण त्राता। दुजा नाही॥

अनाथ मी झालो। द्वारी आज आलो।
एकटा उरलो। जीवनी या॥

म्हाळसा अधरी। बायजा अंतरी।
चरणी चाकरी। होऊ द्यावी॥

आवो साईबाबा। नको काशी काबा।
तुम्ही आई-बाबा। मजला हो॥

**- श्री. संजय के. परळकर**
दादर (प.), मुंबई.

—◆—

# साई-दर्शन

धावते मी तुज गाठाया बद्री केदारी
समजे, निघसी तू कोणत्याही प्रहरी॥१॥

सुचले तुज भेटावे ऋषिकेश हरिद्वारी
शंका मनी असशील ना तेथे खरोखरी॥२॥

का येऊ पाहण्या तुला अयोध्या नगरी
पडणार नाही ना निराशा तेथेही पदरी॥३॥

शोधू का येऊनी मथुरेला यमुना-तिरी
नाही ना जाणार तू गोवर्धन शिखरी॥४॥

पुंडलिकासाठी धावलास पंढरपुरी
तेथे तरी दिससी ही आंस होती अंतरी॥५॥

विसाव्याची वेळ तुझी कशी येऊं माहुरी
एकदाच पाहू दे ना तुला नयनभरी॥६॥

चढण चढले तुजसाठी मी वेंकटगिरी
सांगू कशी तेथे टेकले फक्त क्षणभरी॥७॥

पळे मी ऐकूनी आहेस तू औदुंबरी
पण आपुली स्वारी भिक्षेसाठी करवीरी।।८।।

चाल चालुनी शिणे मी जाता काशी रामेश्वरी
परि तेथेही मम इच्छा राहिली अधुरी।।९।।

थकून भागून अखेर आले मी शिर्डी द्वारी
पाहुनी तुला इथे, विसावले मी जन्मभरी।।१०।।

- सौ. मंदा इनामदार
प्रभादेवी, मुंबई

जे सूर्यातून नक्षत्रातून तेज दिव्य स्फुरते
कला तयाची आत्मज्योती अंतरंगी जळते
जाणुन ते निजज्ञानरुपडे प्रकाश नयनांनी
आत्मा तू अन् मी परमात्मा सत्य एक जाणी

प्रकृति माझी तीन गुणात्मक जी मायाशक्ती
तिचा भेदिता कृष्णपटल ये हाती शीघ्रमुक्ती
माया माझी दुस्तर परि ती सरे कृपायोगे
रजतमसत्वा पैल विहर तू प्रेमकृपासंगे
त्रिगुणांच्याही पल्याड विलसे अनासक्त योग
मला अर्पुनी आचर कर्मे बनुन वीतराग

- गीता

## जुन्यातलं सोनं

# श्री. माधवराव बळवंत (बाबांचा शाम्या) देशपांडे शिरडीकर यांचे अल्प चरित्र

**(श्री साईलीला, शके १९६२ कार्तिक अंकावरून)**

(मागील अंकावरून पुढे चालू)

## देवा

'श्याम' शब्दाप्रमाणे या 'देव' शब्दांतही एकप्रकारची मोहकता, आकर्षकता, पवित्रता, कारुण्य, प्रेम, मातृभाव, उच्चतम भावना भरलेली आहे. तो 'आई' शब्दाइतका प्रिय, गोड आहे. 'आई आई' प्रमाणे 'देवा देवा' या शब्दाचा आपत्प्रसंगी किंवा सलगीचेवेळी ईश्वरावर भरवसा न ठेवणाऱ्या वावदुकाकडून व माता-पितरास तुच्छ लेखणाऱ्या अधम पंडितंमन्याकडूनसुद्धा उपयोग केला जातो. मग श्रद्धाळू भक्ताकडून व जनाकडून उपयोग केला जातो, यात नवल नाही.

अर्जुनही पुष्कळवेळा कृष्ण परमात्म्याला लाडुकपणाने देव म्हणून संबोधी.

प्रिय: पियायार्हसि 'देव' 'सोढूम्' 'देव देव जगत्पते'

'पश्यामि देवास्तव देव देहे'


## मी तू व अरे तुरे

अर्जुन जसे परमात्म्याला मी, तू व अरे तुरे करीत असे, तसे माधवरावही बाबांजवळ नेहमी 'मी तू' ची व 'अरे तुरे'ची भाषा बोलत.

एकदा ब्राम्ही स्थितीत रहा म्हणून सांगतोस व एकदा हा घोर संग्रामही कर, असे म्हणतोस. देवा, तुला असे दुटप्पी सांगण्याची लाज नाही का रे वाटत, असे अर्जुन ज्याप्रमाणे एकदा विनोदाने देवास म्हणाला.

इथे **लाजसीना** महाघोरीं। कर्मी सुता॥३॥

श्री. ज्ञा. अ. ३



## सलगी व विनोद

त्याचप्रमाणे एकदा एकादशीस बाबांचे हातावर एका भक्ताने ताजा ऊन ऊन जोंधळ्याचा हुरडा ठेविला. बाबा म्हणाले, 'शाम्या, हा घे तुला.' माधवराव रागाने म्हणाले, ' देवा, तुला काही लाज वाटते का रे. आज धडधडीत एकादशी आणि तू हे मला असलं हुरडा खाण्याचं पाप करायला सांगतोस! मी नाही घेत जा'.

बाबा म्हणाले, 'बरं, नको खाऊ शाम्या!'

तसेच एकदा भक्तराज अर्जुन देवास म्हणाला, ' देवा, तू एकदा सांख्ययोगाचं अनुष्ठान कर म्हणून सांगतोस व एकदा कर्मयोगाचे अनुष्ठान कर म्हणून सांगतोस. यात खरे काय! आम्ही कोणत्या योगाचे आचरण करावे?

'देवा, तुवांचि ऐसे बोलावें। तरी आम्हीं नेणती काय करावें।।
हां गा उपदेश जरी ऐसा। तरी अपभ्रंश तो कैसा।।७।।

श्री. ज्ञा. अ. ३

'देवा, तूच जर असे दुटप्पी बोलू लागलास तर आमच्यासारख्या अजाणत्या लोकांनी काय करावे? देवा तुझा उपदेशच जर असा असेल तर आमचा मतिभ्रंश करणे तेच आणखी निराळे काय असावयाचे,' असे अर्जुनाने परमात्म्यास एक वेळ थट्टेने, विनोदाने व जरा धिटाईने विचारिले. परमात्मा म्हणाले, 'दोन्ही खरेच. पण सांख्यापेक्षा कर्मयोगाचे अनुष्ठान करणे जास्त चांगले.'

तसेच एकदा एका भक्ताने बाबांना विचारले की बाबा एकादशीस कांदा खावा का न खावा! बाबा म्हणाले, ' खाऊ नये.' तो भक्त पुढे म्हणाला, 'बाबा, कांदा तर कंद आहे, मग खायला काय हरकत आहे?' बाबा म्हणाले, ''खावा तर मग.''

## थट्टा विनोद व धिटाई

इतक्यात माधवराव मध्येच जरा आश्चर्य व उपहासयुक्त मुद्रेने मोठ्याने म्हणाले, 'असलं कसलं रे दुटप्पी बोलणं तुझं देवा! एकादशीस काही खाऊ नये, असं एकदा म्हणतोस, आणि एकदा खावं असं पण म्हणतोस. तुझ्या बोलण्याची मोठी गंमत आहे बुवा. आम्ही ही असली वेडी माणसं म्हणुनशानी तुला विचारायला यावं तर त्वां आम्हाला असं ठकवावं काय रे देवा!'

बाबा म्हणाले, 'शाम्या, मी मशिदीत बसून खोटे नाही बोलत बरं का! तुझ्याच पायाची आण (आण=शपथ). माधवराव म्हणाले, 'मग एकादशीस कांदा खावा का

न खावा हे तर खरं सांगशील की नाही! बाबा म्हणाले, 'एकादशीस कांदा खाऊ नये. आणि जर खावयाचाच असेल तर सबंद खावा. पण ज्याचे अंगात सबंद कांदा खाऊन जिरवण्याची ताकद असेल त्यानेच खावा. पण भलत्याने खाऊ नये. आता जाय घे उदी. याप्रमाणे बाबांनी माधवरावांची न रागवता शांतवृत्तीने गोड व खुबीदार समजूत केली. (येथे कांदा=कंदर्प=काम=मदन)

अर्जुनाने एकदा श्रीकृष्ण परमात्म्यास विचारले की देवा, तू म्हणतोस की हा योग (सांख्य व कर्म) तू प्रथम सूर्यास सांगितलास व नंतर फार फार काळ गेल्यावर आता मला सांगितलास. पण मला हे तुझे बोलणे अगदी खरे वाटत नाही. कारण तो सूर्य इतका जुना आहे की त्याला आपल्या वाडवडिलांनीहि पाहिले नाही. आणि तू तर हा अगदी अलीकडचा. तेव्हा देवा, तू हा योग सूर्याला केव्हा रे सांगायला गेलास? मला तर ही निवळ लोणकडी थाप दिसते.

तरी मागील जे वार्ता। तुंवा सांगितली होती अनंता॥
ते नावक मज चित्ता। मानेचि ना॥३६॥
जे तो विवस्वत म्हणिजे कायी। ऐसे हे वडिला ठाऊके नाही॥
तरी तुवांचि केवि कही। उपदेशिला॥३७॥
तो आइकिजे बहुता काळांचा। आणि तूं तव श्रीकृष्ण सांपेचा॥
म्हणोनि गा इथें मातुचा। विसंवादु॥३८॥ श्री. ज्ञा. अ. ४

बरे, ते असू दे. आता मी जे विचारीन ते नीट सांग, रागाऊ नकोस.


आता पुसेन मी जें कांहीं। तेथे निकें चित्त देई॥
तेवींचि देवें कोपावें नाहीं। बोला एका॥३५॥ श्री. ज्ञा. अ. ४

असे अर्जुनाने विचारले असता परमात्मा म्हणाले, 'अर्जुना, आतापर्यंत तुझे पुष्कळ जन्म झाले व माझेहि झाले. ते सर्व मी जाणतो व तू जाणत नाहीस इतकेच.

---

**असंग आणि अविकारी तू पार्था दिव्यात्मा**
**देहक्षेत्रि तव नित्य नांदू दे विदेह परमात्मा**
**उर्ध्वमूळ हा संसाराचा मायामय वृक्ष**
**छेदून पाही परमात्म्याचे रुप आत्मसाक्ष**
**हेच अर्जुना जीवदशेच्या पैल आत्मसत्य**
**अविनाशी तू स्वत:च अससी पुरुषोत्तम नित्य**

**– गीता**



# श्री साईंचे सत्य चरित्र - अध्याय ५ वा

सटीक गद्य अनुवाद :-
ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
बंड गार्डन रोड, पुणे.

## 'श्री साई-पुन: प्रकटीभवनं'
## (श्री साईंचे शिरडीत पुन्हा प्रकट होणे)

श्री गणेशाला नमस्कार असो. श्री सरस्वती देवीला नमस्कार असो. श्री गुरु महाराजांना नमस्कार असो. श्री कुलदेवतेला नमस्कार असो. श्री सीता व रामचंद्र यांना नमस्कार असो. श्री सद्‌गुरु साईनाथांना नमस्कार असो.

आता बाबा शिरडीत गुप्त होऊन चांद पाटलाबरोबर पुन्हा कसे (परत) आले, त्याची कथा पूर्वीच्या कथेच्या अनुसंधानाने (मेळमिलाफाने) ऐकावी. स्वत: बाबांनी (मातीच्या घड्यांनी) पाणी (जीवन) वाहून कशी बाग निर्माण केली, गंगागीर वगैरे संतांचे एकत्र जमणे (संमेलन) कसे झाले, या गोष्टींकडे लक्ष्य देणे (विदान=विंधान) पावन (पवित्र) करणारे आहे. पुढे काही काळापर्यंत बाबा जे गुप्त झाले होते, ते हे रत्न (रत्नाप्रमाणे उत्कृष्ट व्यक्ती) शिरडीत (आलेल्या) मुसलमानाच्या (लग्नाच्या) वऱ्हाडात (पुन्हा) आढळले. त्याआधी देवीदास शिरडीत येऊन राहिले होते (करुनि होते वास). पुढे जानकीदास नावाचे गोसावी (बैरागी; सांसारिक व्यवहार, सौख्ये इ. सर्वांचा त्याग केलेला योगी) शिरडीत राहावयास आले होते; तो प्रकार कसा घडला, ते आता तपशीलवार (सविस्तर) सांगतो. श्रोत्यांनी लक्ष देऊन आदरपूर्वक ऐकावे. (ओ. २-५)

औरंगाबाद जिल्ह्यातील धूप खेडेगावातील भाग्यवान मुसलमान, ज्याचे नाव चांद पाटील होते, तो औरंगाबादचा प्रवास करीत असताना त्याची एक घोडी हरवली व दोन महिने तिचा तपास लागला नाही (दाद न तिची). आता ती कशाची सापडते म्हणून पाटील पूर्ण निराश झाले. घोडीसाठी खूप हळहळले आणि खोगीर (घोड्यावर बसावयासाठी घालण्याचे जीन) पाठीवर मारून आल्या वाटेने परत फिरले. औरंगाबाद मागे टाकले, साडे चार कोस (नऊ मैल किंवा सुमारे चौदा किलोमीटर) पुढे आले, मार्गात आंब्याचे झाड लागले व त्याखाली (तळीं) हे रत्न (अति उत्कृष्ट व्यक्ती) दिसले. त्याच्या डोक्याला टोपी, अंगात कफनी (लांब झगा) व बगलेत (खाकेस) सटका (दंडा) होता. त्याने तमाखू (तंबाखू) चुरून चिलीम (ओढावयाचा तंबाखू इ. आंत घालून त्यावर निखारे ठेवण्याचे हुक्क्याचे मातीचे भांडे) तयार केली. तोच त्याठिकाणी आश्चर्याची गोष्ट घडली (नवल वर्तले). चांद पाटील रस्त्याने जात

असताना त्याने त्या फकिराला हाका मारताना ऐकले. (फकीर म्हणाला) "ये रे! जरा सावलीत बैस आणि चिलीम पिऊन मग पुढे जा." फकिराने आणखी विचारले की हे खोगीर कशासाठी? तर पाटलाने सांगितले की, घोडे हरवले. तेव्हा फकीर म्हणाला "जा. त्या नाल्यात शोध". आणि घोडे लगेच सापडले. चांद पाटील आश्चर्यचकित झाला व मनात म्हणू लागला, "(आज) अवलिया (साधू) भेटला. याच्या करणीला पार (अंत) नाही. याला (साधा) माणूस कसे म्हणावे?" पुढे तो पाटील घोडी घेऊन परतला आणि पूर्वीच्या जागी आला. फकिराने त्याला जवळ बसविले. आपल्या हाताने चिमटा उचलला, तेथेच मातीत खुपसला, आतून जळजळता (प्रदीप्त) निखारा काढला आणि हातातील चिलमीवर ठेवला. मग छापी (चिलमीला गुंडाळलेले फडके) भिजविण्यासाठी सटका उचलून घेतला. जवळपास पाणी नाही म्हणून जमिनीवर तो आपटला, तर लगेच पाणी निघायला लागले. छापी भिजवून पिळली आणि चिलमीच्या भोवती गुंडाळली (वेष्टिली). स्वत: चिलीम प्याला आणि पाटलालाही पाजली. (चांद पाटलाच्या समोर घडलेले हे चमत्कार बाबांच्या आयुष्यातले लोकांना माहीत असलेले पहिलेच चमत्कार आहेत. चांद पाटलाची हरवलेली घोडी कोठे सापडेल, हे सांगून आपल्या सर्वज्ञतेची आणि चिलीम पिण्यासाठी जळजळता निखारा आणि पाण्याची धार उत्पन्न करून आपली पंचभूतांवरची सत्तेची चुणूक तर बाबांनी नाही दाखविली! पुढे शिरडीत बसून सर्व जगातील घडामोडी त्यांना ठाऊक असत व अग्नी आणि पाणी यांवरचे त्यांच्या सत्तेचे अकराव्या अध्यायातले उदाहरण तर आपल्या सर्वांच्या चांगल्याच परिचयाचे आहे.) (हा चमत्कार पाहून) पाटलाची मतीच गुंग झाली (बुद्धीला काहीच समजेनासे झाले). त्याने फकिराला आपल्या घरी येऊन ते पावन करण्यास आग्रह केला व त्या स्वेच्छेने देह धारण करणाऱ्या (लीला+विग्रह+धारके) बाबांनीही त्या पाटलावर अनुग्रह केला. ते दुसऱ्याच दिवशी गावात गेले, पाटलाचे घरी उतरले, काही काळ तेथेच राहिले आणि मग ते परत शिरडीला आले. हा चांद पाटील धूप खेड्याचा ग्रामाधिकारी होता. त्याच्या बायकोच्या भाच्याला (भावाच्या मुलाला) नवरी (नोवरी) साठी शिरडीत विवाहसंबंध (सोयरिक) जुळला. चांदभाईच्या कुटुंबाचा (बायकोचा) भाचा लग्नायोग्य झाला होता. त्याला शिरडीच्या वधूचा शरीरसंबंधाचा सुयोग घडला. (त्याने लग्नाचे) वऱ्हाड, बरोबर (सवे) गाड्या घोडी घेऊन शिरडीस यावयास निघाले आणि बाबादेखील त्या चांदभाईच्या ओढीने (आकर्षणाने) त्या वऱ्हाडात सामील (प्रवीष्ट) झाले. लग्न झाले, वऱ्हाड परतले, बाबा एकटेच मागे राहिले व राहिले ते राहून गेले आणि शिरडीचे भाग्य उदयास आले (उदेले). (ओ. ६-२३)

साईबाबा हे अविनाशी (नाश न पावणारे) व पुरातन (प्राचीन) आहेत. ते हिंदूही नाहीत व मुसलमानही (यवनही) नाहीत. ते जात, पात, कूळ, गोत (गोत्र) याशिवायचे आहेत आणि आत्मज्ञान (निजबोध) हेच त्यांचे स्वरूप (स्वत:चे स्वाभाविक रूप) आहे. लोक जे 'साई साई' म्हणतात, ते काय त्यांचे ठेवलेले नाव होते? 'या साई' म्हणून बहुमानाने त्यांना हाक मारली गेली (संबोधन), तेच हे नाव होय! आरंभी वऱ्हाडाबरोबर खंडोबाच्या देवळापाशी (हे खंडोबाचे देऊळ शिरडी एस्.टी. बसस्थानकाकडून गावाकडे जाताना रस्त्याच्या डाव्या हाताला संस्थानच्या श्री साईनाथ रुग्णालयाच्या शेजारी लागते. खंडोबा हा महाराष्ट्राचा लोकदेव असून अनेक घराण्यांचे कुलदैवत आहे. हा शंकराचा अवतार मानला जातो व त्याच्या म्हाळसा व बाणाई ह्या दोन पत्नी आहेत. शुभ्र पांढरा घोडा हे त्याचे वाहन व खड्ग किंवा तलवार (खंडा) हे त्याचे शस्त्र आहे. मणी व मल्ल या दोन दैत्यांचा त्याने संहार केला म्हणून त्याला मल्हारीही म्हणतात) म्हाळसापतीच्या अंगणात (खळियासी) बाबा उतरल्यादिवशी हे (नाव) पडले. सुरुवातीला ते भगताचे (म्हाळसापतीचे) अंगण होते. पुढे ते अमीनभाईचे झाले. लग्नाचे जे वऱ्हाड आले, ते येथेच (याच पटांगणात) वडाच्या झाडाखाली (मुक्कामासाठी) उतरले. खंडोबाच्या पटांगणात (उघडद्या जागेत) सर्व गाड्या सुटल्या व बाबादेखील तेथे सर्वांबरोबर उतरले. हे बाल-फकीर गाडीतून खाली उतरलेले प्रथम भगताच्या (म्हाळसापतीचे) दृष्टीस पडले. तेव्हा ते 'या साई' म्हणून त्यांना सामोरे गेले व तेथून हे नाव पडले. पुढे मग तेव्हापासून लोक 'साई साई' असे म्हणून हाक मारू लागले आणि तेच नाव रूढ झाले (नामाभिधान झाले). नंतर बाबा तेथे (म्हाळसापतीकडे) चिलीम प्याले, मशिदीत राहावयास गेले, देवीदासांच्या (बाबांच्या आधी १०-१२ वर्षांपासून शिरडीत येऊन मारुतीच्या देवळात राहिलेल्या बैराग्याच्या) सहवासात रमले आणि शिरडीत सुखावले. बाबांची बैठक कधी चावडीत (गावातील कामकाजाची व प्रवासी वगैरेंसाठी उपयोगी पडावी अशी सार्वजनिक जागा), तर कधी देवीदासांच्या संगतीत, तर कधी मारुतीच्या देवळात (हे देऊळ शिरडीत द्वारकामाई आणि चावडी यामधील रस्त्याच्या समोर उत्तरेस आहे. आश्चर्य म्हणजे यात मारुतीच्या दोन मूर्ती जवळजवळ स्थापन केलेल्या आहेत. पुढे सभामंडपाची ऐसपैस जागा आहे. तेथेच साईबाबा देवीदास व जानकीदास यांच्याबरोबर गप्पा मारत बसत असत.) असे व लहर येईल तेथे ते रमून (स्वच्छंदरत) राहत असत. हे देवीदास शिरडी गावात बाबांच्या आधीच आलेले होते. पुढे जानकीदास नावाचे महानुभावी (विद्या व बुद्धी यांनी श्रेष्ठ) गोसावी शिरडीत आले. त्या जानकीदासांबरोबर (साई) महाराज बोलत बसत असत. उभयतांचे मोठे प्रेम होते व त्यांची बैठक नित्यनेमाची असावयाची. त्यांचा हा असा समागम सगळ्यांनाच अत्यंत सुखदायक झाला होता. (ओ. २४-३५)

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्‌चरित | मराठी | ३१-०० | ९-०० |
| २. | –"– | इंग्रजी | १२-५० | ६-५० |
| ३. | –"– | हिंदी | १६-७५ | – |
| ४. | –"– | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | –"– | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | –"– | तेलगु | १९-०० | ८-०० |
| ७. | –"– | तामीळ | – | – |
| ८. | –"– | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साईसत्‌चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | ९-०० | – |
| ११. | –"– | हिंदी | ११-०० | – |
| १२. | –"– | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ४-२५ | – |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | –"– | हिंदी | १-१५ | ३-५० |
| १६. | –"– | गुजराथी | ०–९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | –"– | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | –"– | गुजराथी | ०-९५ | ३-५० |
| २०. | –"– | तेलगु | ३-५० | ५-५० |
| २१. | –"– | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ६-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | १-५० | – |
| २५. | –"– | इंग्रजी | १-८५ | – |
| २६. | –"– | हिंदी | १-५० | – |
| २७. | –"– | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | –"– | तेलगु | २-०० | – |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १-१५ | ३-५० |
| ३०. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६-०० | ४-०० |
| ३१. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ४-५० | ४-०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-५० | ४-०० |
| ३३. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |
| ३४. | स्तवनमंजरी | इंग्रजी | १-१० | ३-५० |
| ३५. | शिरडी डायरी (खापर्डे) | इंग्रजी | ९-५० | ४-५० |

Licence to Post Without Prepaym
at Dadar Head Office, Bombay
Regd.: No. MH/BYE
LICENCE No

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. क्र. | फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | १४" x २०" | १.७५ | ५.५० |
| २. | –"– | पोष्टकार्ड | ०-२५ | "–" |
| ३. | –"– | २" x ३" | ०-१० | –"– |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १७" x २२" | २-८० | –"– |
| ५. | –" | १४" x २०" | १-७५ | –"– |
| ६. | –" | १०" x १४" | १-१५ | –"– |
| ७. | मूर्ती (४ रंगात) | १४" x २०" | १-७५ | –"– |
| ८. | –"– | १०" x १४" | १-१५ | –"– |
| ९. | –"– | ७" x १४" | ०-६० | –"– |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १४" x २०" | १-७५ | –"– |
| ११. | –"– | १०" x १८" | १-१५ | –"– |
| १२. | –"– | ७" x १०" | ०-६० | –"– |
| १३. | चेहरा फोटो (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०-२५ | –"– |
| १४. | पालखी (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०-२५ | –"– |
| १४. | पालखी (४ रंगात) | ७" x १०" | ०-६० | –"– |
| १५. | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४" x २०" | १-४० | –"– |

**पुस्तकं आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :—**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी
पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर - ४२३ १०९.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.

मुद्रक : श्री. एम. डी. राजन, गीता ऑफसेट, बी-२३, रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट,
नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.
**संपादक व प्रकाशक :** कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी,
साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४.

श्री

मार्च १९९०) (किमत २ रु.

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



मार्च १९९०

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक
कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी

वर्ष ६८ वे) किंमत २ रुपये (अंक १२ वा
दूरध्वनी ४१२२५६१

–: कार्यालय :–

पोस्ट-शिरडी-४२३ १०९, जिल्हा-अहमदनगर.
साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/-
(ट.ख.सह)
तहहयात वर्गणी – रु. ३००/-
इतर देशांकरिता ट. ख. सह वार्षिक वर्गणी रु. ११५/-

श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे
हे श्री साईलीला मासिकाचे मुख्य उद्दिष्ट आहे.



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

१०१

मायेचा उगम आपुले हृदयीं। जवळच ठायीं ब्रह्म वसे।।
ब्रह्मापासोनीयां नाहीं ती निराळी। उदकी शेवाळीं जैसी असे ।।
सद्गुरुवांचूनी कोण दुरावील। अथवा राहिल दाटूनीयां।।
ज्ञानसूर्य माझा गुरुबाबा सांई। लेंकुरासी आई तैसा दासा।।

१०२

वसे जया मनी सद्गुरुचिंतन। तयाचें वदन तेजःपुंज।।
सदाची दिवाळी सदाचा दसरा। तयासी आसरा देवाजीचा।।
येवो अडचणी येवो नाना व्याधी। देहाची उपाधी नसे जया।।
दास म्हणे नसे तयां हाय हाय। सद्गुरुचे पाय ध्यानी मनी।।

१०३

सद्भावें करावी सद्गुरुची प्रार्थना। त्यजुनी वासना मनांतील।।
ठेवावें वदन सुप्रसन्न गोड। होईल आवड तेणें देवा।।
गाव्या बोलाव्या गुलगुल गोष्टी। ठेवूनियां दृष्टी चरणावरी।।
नये दुःखमार घालूं देवावरी। जाणे तो अंतरी दास म्हणे।।

या मासिकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | संपादकीय | – श्री. चकोर आजगांवकर | ८ |
| २. | हीच माझ्या दरबारची माणसे! | – सौ. उषा अधिकारी | १२ |
| ३. | श्री साई अष्टोत्तरशत नमस्क्रिया | – श्री. सुधांशु कुमार नायक | १४ |
| ४. | देवो भव | – श्री. दिगंबर बुलबुले | १५ |
| ५. | दार उघड साई | – सौ. नीता जाधव | १७ |
| ६. | तुमचा मी भार वाहीन सर्वथा | – प्रा. श्री. आयू. पी. अुमराणी | १८ |
| ७. | जया मनी जैसा भाव | – श्री. माधवराव भागवत | १९ |
| ८. | मारितो मी हांक बाबा | – श्री. सुधीर आपटे | २३ |
| ९. | देव आणि धर्म | – वैखरीताई | २४ |
| ०. | शिरडीतील एक अनोखा सोहळा | – | २५ |
| १. | श्रद्धा | – फकीर | २७ |
| २. | मोक्षाचे धाम | – श्री. बबन येरम | २८ |
| ३. | गातसे गीता गोविंद | – श्री. चकोर आजगांवकर | २९ |
| ४. | श्री साईंचे सत्य चरित्र, अध्याय ५ वा | – श्री. मु. ब. निंबाळकर | ३४ |
| ५. | दिव्य जीवनाकडे | – श्री. चकोर आजगांवकर | ४० |
| ६. | श्री साईंचे शिरडीला पुनरागमन | – श्री. वि. कृ. सहस्रबुद्धे | ४३ |
| ७. | साईंचा आधार | – शंकरानंद | ४६ |
| ८. | आळवणी | – श्री. बाबू डिसोजा | ४७ |
| ९. | साई दर्शन दे आता | – श्री. महेश ठाकूर | ४७ |
| ०. | हीच इच्छा मानसी | – श्री. शंकर इनामदार | ४८ |
| १. | साई-कृपा | – श्री. अ. द. जवळकर | ४९ |
| २. | प्रार्थना | – श्री. रामचंद्र गोळेकर | ४९ |
| ३. | मानवी-जीवन | – श्री. शाम जुवळे | ५१ |
| ४. | श्री. माधवराव बळवंत (बाबांचा शाम्या) देशपांडे शिरडीकर यांचे अल्प चरित्र | – | ५२ |
| ५. | श्री दत्तगुरुंची प्रवचने | – | ५५ |
| ६. | सांगाति | – | ५६ |
| ७. | भक्ती | – सौ. शशीकला सोनावणे | ५७ |
| ८. | बाबांचे दोन पैसे | – श्री. जनार्दन बांदेकर | ५८ |
| ९. | ही तर माझ्या साईंची कृपा! | – सौ. सुमन पतंगे | ६० |
| ०. | "श्री साईलीला" – मानवतावादी तत्त्वज्ञान | – | ६१ |

......हल्लीं मुंबई, पुणें, गुजराथ, कलकत्ता, मद्रास, वगैरे शिरडीहून फार लांब असलेल्या जागीं श्रीसांईमहाराजांचे उत्सव सार्वजनिक रीतीनें साजरे केले जात आहेत. तसेंच निरनिराळ्या प्रांतांतून असंख्य लोक त्यांच्या समाधीचें दर्शन घेण्यासाठीं दररोज शिरडी येथें येतात. अशा वेळीं प्रत्येकानें फारच सावधगिरीनें रहावें अशी सूचना द्यावीशी वाटते. "आपण श्रींचे पट्टशिष्य आहों, बाबा आपल्याशींच प्रत्यक्ष बोलतात, तुझ्यासाठीं अमूक संदेश दिला आहे, तुझें म्हणणें मी बाबांना सांगेन, तुझें काम लवकर होईल," वगैरे तऱ्हेची बुवाबाजी ठिकठिकाणीं चालू असल्याचें दिसून येतें; इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष शिरडींत सुद्धां असे लोक आहेत कीं, "श्रींची प्रार्थना केल्यावर दररोज बाबा आपल्यापाशीं बोलतात" असा प्रचार आपल्या सहकाऱ्यांमार्फतहि करण्यास कमी करीत नाहींत. एकमेकांच्या सहवासानें प्रथमच शिरडींत आलेला गृहस्थ शिरडीची विशेष माहिती नसल्यामुळें अशा बुवाबाजीच्या आहारीं जाण्याचा बराच संभव असतो.

श्रीसांईबाबा प्रत्यक्ष परमेश्वर असून स्वतः मनोभावानें केलेली प्रार्थना त्यांना पोहोंचते; त्यासाठीं मध्यस्थांची आवश्यकता नाहीं, याचें प्रत्यंतर श्रीसांईबाबांच्या हजारों भक्तांना आहे. त्यांच्या समाधीचें दर्शन, त्यांचें स्मरण, मनन, वाचन वगैरे करीत असल्यास हा अनुभव खात्रीनें येतो. श्रीसांईबाबांचे वेळीहि असे पुष्कळ ढोंगी लोक तेथे येत आणि फजित होऊनच परत जात. कै. मुक्ताराम (रावेर, खानदेश) हे श्रींच्या वेळीं शिरडींत होते. श्रीसांईनाथांनीं देह ठेवल्यावर दोन दिवसांनीं ह्या गृहस्थांनीं तेथील लोकांस सांगितले, "श्रीबाबांनीं मलाच आपल्या जागीं द्वारकामाईंत बसण्याचा आदेश दिला आहे. मीच त्यांचा वारस आहें." कै. तात्याबा कोते पाटील, श्री. रामचंद्र पाटील, वगैरे मंडळींनीं तसें न करण्यासाठीं त्यांना समजावून सांगितलें पण कोणाचें न ऐकतां सर्वांना झिडकारुन बाबा बसत त्या जागीं जाऊन बसले. अगदीं थोड्याच वेळांत त्यांना खालून सुया टोंचूं लागल्या व रक्त पडूं लागलें. त्या जागेवरुन बाजूला बसले तरी तीच स्थिति; शेवटीं सातआठ दिवसांतच भयंकर हालांत त्यांनीं श्रींची क्षमा मागून प्राण सोडला. यांची समाधी लेंडीबागेंत आहे. असेच हक्क सांगणारे आणखी तीन चार गृहस्थ त्या वेळीं होते, पण वरील स्थिती पाहून ते दुसऱ्या ठिकाणी गेले.....

—दोन शब्द (ग्रंथकर्ते कै. गोविंदराव रघुनाथ दाभोलकर ऊर्फ अण्णासाहेब यांचें संक्षिप्त चरित्र व भक्तांस सूचना)

**- श्री साईसत्‌चरितातून पुन्हःप्रकाशित**

## तथाकथित मध्यस्थ वा सेवेकऱ्यांबाबत इशारा

काही व्यक्ती श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे स्वतः "सेवेकरी" आहोत, असे सांगून श्री साईबाबांचा प्रसाद देऊन भक्तजनांकडून देणग्या गोळा करतात, हे अत्यंत निंद्य व निषेधार्ह आहे.

संस्थानचे असे कोणतेही सेवेकरी वा मध्यस्थ नाहीत. भक्तांना नम्र विनंती आहे की, अशा कोणत्याही व्यक्तीशी कोणताही व्यवहार करू नये. अशा व्यवहाराबाबत संस्थान जबाबदार राहणार नाही.

**- कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

# ''श्री साईलीला'' लेखक-कवींना निवेदन

## गद्य लेखन

''श्री साईलीला''कडे साहित्य पाठविताना ''श्री साईलीला'' लेखकांनी पुढील प्रकारात आपले लिखाण बसते का, याची दक्षता घ्यावी.

### (१) सर्वसाधारण

* दिवंगत थोर संत महात्म्यांवर आधारित समयोचित लिखाण. त्यांच्या जीवन-उपदेशाचे बाबांच्या जीवन-उपदेशाशी समांतरत्व विशेषत्वाने प्रगट असावे.

* श्री साईबाबांचे पूर्व व समकालीन संतांचे तत्त्वज्ञान, कार्यप्रणाली व श्री साईबाबांचे तत्त्वज्ञान, कार्यप्रणाली यांतील साम्य व भेद.

### (२) अनुभव

* श्री साईबाबांचे उपदेश आचरण करताना आलेले अनुभव. लेखकांनी आपले विचार मोकळेपणे व कलापूर्णरित्या मांडावे.

* श्री साईबाबांच्या कृपाछायेचे अनुभव. हे अनुभव सांसारिक अडी-अडचणींचे असावेत, तसेच साधना करताना आलेले अनुभवही असावेत.

### (३) शिकवण

* श्री साईबाबांचे उपदेश, बोल व घटना यांविषयी आपल्याला झालेले आकलन, उमगलेला विश्लेषणात्मक अर्थ.

### (४) भाषांतर

* श्री साईबाबांच्या जीवनावरील अन्य भाषेतील समर्पक लिखाणाचे अनुवाद. (मूळ लेखकाचा, पुस्तकाचा संदर्भ देणे आवश्यक)

(५) महिला व बालसाईभक्त

* बालसाईभक्तांसाठी हलक्या-फुलक्या, सहज-सोप्या भाषेत आध्यात्मिक लिखाण. महिलांसाठी खास साईभक्तीपर लेखन.

(६) धर्म - अध्यात्म

* विचार प्रवर्तक आध्यात्मिक लिखाणास प्राधान्य मिळेल. योग, भक्ती, ज्ञान व इतर साधनांबाबत वाचकांना प्रबोधन होईल, अशा लिखाणाचा विशेष विचार केला जाईल.

## कवितालेखन

* कवींनी आपले दर्जेदार काव्यच ''श्री साईलीला''त प्रसिद्ध करण्यासाठी पाठवावे. वृत्त, ताल, छंद वा मुक्त छंद इत्यादी आकृतीबंधात न बसणाऱ्या कविता स्वीकारणे शक्य होणार नाही. यासाठी कवितांची रचना व आशय याकडे अधिक लक्ष पुरवावे. कविता बाबांच्या चरित्र-लीलांवर किंवा परमेश्वरावरील स्वतःच्या भक्तिभावनेचे आविष्करण करणाऱ्या असाव्यात.

* ''श्री साईलीला''करिता साहित्य लिहिताना कागदाच्या दोन्ही बाजूस पुरेसा समास सोडावा, दोन ओळींच्यामध्ये पुरेसे अंतर ठेवावे, कागद जीर्ण-विजीर्ण असू नये, आशय व्यक्त करताना तो मुद्देसूद व सलगपणे मांडावा.

## अस्वीकृत लिखाण

* ''श्री साईलीला'' लेखक-कवींनी आपल्या काव्य व लेखाची एक प्रत स्वतःच्या रेकॉर्डसाठी स्वतःकडे ठेवणे आवश्यक आहे. प्रसिद्ध न झालेले साहित्य परत पाठविणे अशक्य आहे. तरी, त्यासंबंधीची विनंती कृपया करू नये.

* लेखक-कवींनी देण्यात येणाऱ्या सूचनांचा बारकाईने अभ्यास करावा. या सूचनांनुसार निवडलेले लेख, कविता, अनुभव यांचाच प्रसिद्धी करिता विचार केला जाईल.

# ‘‘श्री साईलीला’’ सभासदांना निवेदन

*** ‘‘श्री साईलीला’’ संबंधी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करताना ‘‘श्री साईलीला’’च्या जुन्या सभासदांनी त्यांच्या ‘‘श्री साईलीला’’ सभासद क्रमांकाचा पत्रात उल्लेख करावा.**


* ‘‘श्री साईलीला’’ वेष्टनावर वर्गणी केव्हा संपत असल्याचा महिना व वर्ष नमूद केलेले असते, त्याप्रमाणे वर्गणी संपण्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर आपली वर्गणी भरावी.

* पत्त्यात बदल झाल्यास शिरडी कार्यालयाला त्वरित कळवावे, पिनकोडसहित पूर्ण पत्ता लिहावा.

* आपल्या पत्त्यात काही दुरूस्ती सुचवायची असल्यास, पत्ता अपूर्ण लिहिला जात असल्यास त्याविषयी त्वरित शिरडी कार्यालयाच्या निदर्शनास आणावे.


* ‘‘श्री साईलीला’’ मासिकाचे नवीस सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या शिरडी व मुंबई कार्यालयाकडे प्रत्यक्ष/मनिऑर्डरद्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास तो ‘‘श्री साईबाबा संस्थान शिरडी’’ या नावावर असावा. मनिऑर्डर कोणत्या कारणासाठी करीत आहात, त्याचा उल्लेख मनिऑर्डरवर करणे आवश्यक आहे. ‘‘संदेश के लिए स्थान’’ आणि ‘‘भेजनेवाले का नाम व पूरा पता’’ असे नमूद केलेले असते, त्या दोन्ही ठिकाणी सभासदांनी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

* मनिऑर्डर-पत्रावर नाव-पत्ता लिहिताना तो वाचता येईल, अशा स्पष्ट अक्षरांत लिहावा.



# ''श्री साईसत्‌चरिता''तील भक्तिरहस्य-(३)
# बाबांचे पूर्ववृत्त - एक चिकित्सा

## संपादकीय



श्री साईसत्‌चरितातील कै. दाभोलकरांच्या संकीर्तनभक्तीबद्दल व हेमाडपंत-दासगणूंच्या भावानुभावबद्दल मागील दोन लेखांत परामर्ष घेतला. आता आपण बाबा शिर्डीत प्रथम जेव्हा आले तेव्हा त्यांच्या व्यक्तिगत माहितीबद्दल कै. दाभोलकर तथा हेमाडपंतांनी कशा प्रकारची चिकित्सा केली आहे, त्यांचा बुद्धीगम्य भूमिकेतून मागोवा घेऊ या.

हेमाडपंत म्हणतात की, ''तैसेचि हे साईनाथ। तरुण सोळा वर्षांचे वयात। निंबातळी शिरडी गांवात। प्रथम भक्तार्थ प्रगटले।।'' त्यांचा जन्म, मातापितरे, पूर्वावस्था यांचा थांगपत्ता कुणाला लागला नाही. नाना चोपदारांच्या वृद्ध मातेने हे कोवळे पोर रात्रंदिनी निंबाच्यातळी उन्हातान्हात उघड्यावर तपश्चर्येत काळ व्यतीत करीत होते. खंडोबाचे वारे घुमू लागल्यावर कुणीतरी उत्कंठेने त्यावाऱ्यास मुलाचा पूर्वेतिहास विचारला, असे सांगितल्याचे हेमाडपंतांनी नमूद केले आहे. निंबाच्यातळी खणल्यावर तिथे सुंदर भुयार सापडले. खंडोबाच्या वाऱ्याने या ठिकाणी या कोवळ्या पोराने बारा वर्षे तप केल्याचे सांगितले. बाबांना विचारले असता त्यांनी ''हे माझ्या गुरुचे स्थान आहे, या ठिकाणी जो गुरुवारी, शुक्रवारी धूप जाळील, त्याला अमाप सुख श्रीहरी देईल'' असे सांगितले. या कथेवर हेमाडपंतांनी हेमाडपंती भूमिकेतून चर्चा, चिकित्सा वा संशोधन केलेले दिसत नाही, याचे फारच आश्चर्य वाटते. त्यांनी एका भोळ्या भाविकाप्रमाणे विनम्रभावाने ही उपकथा स्वीकारलेली दिसते. चतुर्वर्ग चिंतामणीसारखा व्युत्पन्न ग्रंथ लिहिणाऱ्या हेमाडपंतांनी निदान बाबांना त्यांचे पूर्ववृत्त विचारावयास हवे होते. बाबांची त्यांच्यावर कृपा होती. त्यांच्या विनम्र प्रश्नांना बाबांनी नक्की काहीना काही उत्तर दिले असते. कारण आपला चरित्रकार म्हणून हेमाडपंतांना गौरवपूर्व अनुमती बाबांनीच दिली होती. यामुळे एका संशोधन प्रयासास आपण दुर्दैवाने मुकलो आहोत. हेमाडपंतांनी असंख्य साईभक्तांसाठी हे काम करावयास हवे होते, असे आम्हाला वाटते.

कै. काकासाहेब दीक्षितांनी ''श्री साईसत्चरिता''च्या प्रस्तावनेत बाबांचा निझामशाहीतील मुलखाशी निश्चित संबंध होता, असे अधिकारवाणीने सांगता येईल, असे म्हटले आहे. शेलू, जालना, मानवत, पाथरी, परभणी अशा मराठवाड्यातील स्थानांचा त्यांच्या बोलण्यात बऱ्याचवेळा उल्लेख असे. एका पाथरी येथील पांथस्थाबरोबर तेथील परिस्थिती विषयक व प्रमुख व्यक्तिविषयक बाबांनी जिव्हाळ्याने चौकशी केली होती. कोऱ्हाळे गावी कामासाठी आलेल्या एका इसमाकडे बाबांनी पाथरीच्या रहिवाश्यांची चौकशी केली होती, असे म्हाळसापतींनी आपल्याला कथन केल्याचे नरसिंह स्वामींनी बाबांच्या चरित्रात म्हटले आहे. स्वामी शरणानंदांच्या साईचरित्रातही माधवनाथ महाराजांनी बाबांचा जन्म पाथरीचा असून त्यांना एका फकिराने ब्राह्मण मातापित्यापासून मागून नेऊन १२ ते १८ वर्षापर्यंत शिक्षण दिल्याचे नमूद केलेले आहे. वरील घटनांचा उल्लेख श्री. विश्वासराव खेर यांनी आपल्या संशोधन लेखांत (श्री साईलीला, जानेवारी, १९७६) आवर्जून केला आहे. श्री सत्यसाईबाबा यांनी बाबांचा पाथरी येथील देवगिरम्मा व गंगाभव या ब्राह्मण दांपत्याच्यापोटी बाबांचा शिवाच्या कृपेने जन्म झाल्याचे सांगितले आहे. हा मुलगा एका फकीर जोडप्याने पाळला. तो मशिदीत शिवलिंग पूजीत असे. त्यापुढील हकीगत त्यांनी कथन केलेली नाही. यामुळे त्यांचा पुढील जीवनप्रवास त्यांच्याकडून प्रगट झालेला नाही. हा एक महत्त्वाचा दुवा आपल्याला त्यामुळे एका विद्यमान विभूतीद्वारे मिळालेला नाही. श्री. खेर हे बाबा पाथरी येथील भुसारी या देशस्थ कुटुंबातील होते, त्यांचे कुलदैवत हनुमान होते व पाथरी येथील त्यांच्या घरामागे लेंडी ओहळ आहे. अशा निष्कर्षाच्या जवळपास आलेले आहेत. पण त्यांचा या बाबत आग्रह नाही.

डॉ. के. भ. गव्हाणकर हे एक थोर साधक व साक्षात्कारी भक्त होते. दासगणूंना बाबांनी आपण शेलू (परभणी) येथून आल्याचे सांगितले होते, असे गव्हाणकर यांनी नमूद केले आहे. रामगीर गोसावी यांना बाबांनी आपण माहूरला लहानाचे मोठे झालो, गिरनारला गेलो, अबूच्या पहाडावर राहिलो, अक्कलकोट गाठले, दौलताबाद येथे राहिलो, मग पंढरपूरमार्गे शिरडीस आलो, असे सांगितले होते. आपण दत्तांची एक कला आहे, हेच याद्वारे बाबांनी सूचित केले असावे. एक भक्त श्री. पितळे यांना पूर्वी अक्कलकोटस्वामींनी दिलेले रुपये ''मी दिल्याचे'' बाबांनी सांगितले, याचाही मतितार्थ हाच की बाबा दत्तरुप होते. अनेक संतांना ते बंधू म्हणून उल्लेखीत. उदाहरणार्थ अनगांव कवाडचे सखाराम बाबा, वासुदेवानंद सरस्वती, गजानन महाराज (शेगांव), मौलीसाहेब (नांदेड). समकालीन थोर संतांना ते बंधू मानीत, तर जुन्या समाधिस्त अवलियांना ते गुरु मानीत. शिरडी येथील गुरुस्थान हे अशाच एका जेष्ठ संताची

समाधी असावी, असे वाटते. याची चिकित्सा हेमाडपंतांकडून झाली नाही, त्यामुळे एका थोर चरित्रकाराचे संशोधन व चिकित्सा याला आपण मुकलो, असे म्हणावे लागते.

आर्थर ऑसबर्न आपल्या साईचरित्रात म्हणतात की, निंबवृक्षाच्यातळी खणल्यानंतर एक समाधी सापडली. बाबांची ही समाधी आपल्या गुरुची आहे, असे सांगितले. कोणत्या गुरुची? या जन्मातील नव्हे, तर पूर्वीच्या एखाद्या जन्मातील ते गुरुस्थान असावे. आपल्या प्रिय गुरुचा ''व्यंकुशा' असा बाबा उल्लेख करीत.

स्वामी शरणानंदांना त्यांनी आपले गुरु रोशनशहा (प्रकाशरुप) असल्याचे सांगितले होते. आमचे नाथपंथी गुरु डॉ. घटवाई यांना नागपूरच्या ताजुद्दीन बाबांनी आपण पूर्वजन्मी ''व्यंकुशहा'' होतो व शिरडी येथे माझ्या शिष्याचा दरबार आहे, असे सांगितले होते. डॉ. घटवाई ऐन तारुण्यात शिरडी येथे बाबांच्या दर्शनास गेले असता बाबांनी ''माझ्या गुरुघरचा बच्चा'', या शब्दात त्यांचे स्वागत केल्याचे डॉ. घटवाई यांनी आम्हाला सांगितले. डॉ. घटवाई हे प्रसिद्धी विन्मुख होते व त्यांची आत्मिक साधना आम्ही अनुभवली असल्याने त्यांच्यावर आमचा विश्वास आहे. पण डॉ. घटवाईंची श्रद्धा व अनुभव आम्ही इतरांना स्वीकारा, असे सांगणार नाही. कारण त्याला लेखी वा ऐतिहासिक पुरावा डॉ. घटवाईंनी दिलेला नाही. त्यामुळे हे एक मत म्हणूनच आम्ही मांडीत आहोत. मात्र बाबा ताजुद्दीनांना ''नागपुरच्या पूर्वेकडील सोन्याचे झाड'', असे म्हणत. यावरून ताजुद्दीन बाबांना त्यांच्या लेखी फार मोठा आदर व गुरुसमान बहुमान होता, एवढे मानावयास काहीच प्रत्यवाय नाही. त्यांची नाथदीक्षा बाबांच्या गुरुमार्गाशी समांतर असावी.

एवढा प्रपंच केल्यानंतर आणखी एक उपकथा मांडतो. दासगणूंनी साईहरिकथेत व्यंकटेशाचे भक्त श्री गोपाळस्वामी उर्फ व्यंकुशहा हे एक मोगलाईतील अधिकारी व आध्यात्मिक गुरु असल्याचे नमूद केले आहे. बाबांना फकीर जोडप्याने ब्राह्मण मातापितराकडून मिळवून संगोपिले व फकिराच्या मृत्यूनंतर श्री साईंना गोपाळस्वामींच्या आश्रमात फकीर-पत्नीने सोडले. या गोपाळस्वामींना अहमदाबादेस तीर्थयात्रेस गेले असता सुबागशहा या पीराच्या दर्ग्यात ते स्वत: रामानंद महाराज असल्याचा व त्यांचा शिष्य कबीर मानवतजवळ जन्माला येत असल्याचा दृष्टांत झाला होत. त्यामुळे बालसाईंचा स्वीकार करुन व्यंकुशहा गोपाळस्वामींनी त्यांना ज्ञानभक्ती, कर्ममार्गाचे सारसर्वस्व दिले, अशी ही उपकथा आहे.


या कोणत्या कथांवर किती विश्वास ठेवायचा, हे सूज्ञ वाचकांनी स्वतःच स्वतःचे ठरवायचे आहे. पण एक मात्र खरे की, बालसाईवर हिंदु, मुस्लिम साधनेचा व जीवनसरणीचा ठसा होता व त्यांचे गुरु कुणीतरी व्यंकुशहा होते. व्यंकुशहा नंतर त्यांच्यावर प्रत्यक्ष सरकारची (दत्तांची) कृपा झाली असावी. हा फकीर अल्लामिया, मलंग, जगद्गुरु त्यांना कोठे भेटला, ते सांगता येणार नाही. कदाचित पंढरपूरजवळ मंगळवेढ्यास स्वामींच्या स्वरुपात भेटला असेल. हा एक तर्क आहे. तो तपासून पाहिला पाहिजे.

कारण बाबांनीच स्वतः बापूगीरांना आपण गिरनार अबूवरुन अक्कलकोटद्वारे शिरडीस आल्याचे सांगितले. डॉ. रामराव कोठारे व स्वामीसमर्थभक्त भाई अलिबागकर यांनी गुरुंच्या पादुका गुरुस्थानी बसविल्या आहेत, हा काही योगायोग नाही. बाबांची अनुज्ञा आहे. हे देवाचे पाय आहेत, असे बाबा म्हणत. स्वामीभक्त भाई अलिबागकरांना बाबांनी अक्कलकोटला जाऊ नको, स्वामी येथे शिरडीत आहे, असे सांगितले होते. या श्री साईसत्चरितातील हेमाडपंतांच्या उपकथेद्वारे समांतर कथांचा विचार या लेखात आम्ही मुद्दाम एवढ्यासाठी मांडला आहे की, आमच्या सूज्ञ वाचकांच्या विचार बुद्धीला वा चिकित्सेला चालना मिळावी. कोणतेही एक एकांतिक मत मांडण्याची वा प्रसारण्याची भूमिका आम्हाला मान्य नाही. अंधश्रद्धेपेक्षा चिकित्सा श्रेयस्कर.

**- चकोर आजगांवकर**
हंगामी कार्यकारी संपादक
१४ गिरिसमीप, श्रीनगर, ठाणे-४.
दूरध्वनी-५०९१८०

**श्रीकृष्ण :** रे पार्था आहे कर्म मानवी धर्म
हे ज्ञान फळा ये विकासता सत्कर्म
आमरण न टळतो ज्ञान्यासहि आचार
कर्तव्य, दान, तप, देहधर्म, व्यवहार

- गीता



# हीच माझ्या दरबारची माणसे !

- सौ. उषा प्र. अधिकारी
बंदर रोड, रत्नागिरी.

वांद्रे शहरानजिक सांताक्रूझ नावाच्या शहरात हरिभक्त पारायण धुरंधर आडनावाचे एक कुटुंब रहात होते. सगळे बंधू श्री रामभक्त. रामचरणी त्यांची अनन्यभक्ती होती. हे कुटुंब सत्शील, सदाचरणी होते. कुणीही कुणाच्या आल्यागेल्यात नसे. घरातले पुरूषच काय, पण स्त्रिया आणि मुलेबाळेही अतिशय विनम्र वृत्तीची होती. यांमध्ये श्री. बाळाराम धुरंधर हे विठ्ठलभक्त होते. राजदरबारी त्यांचा मोठा लौकिक होता. ते सर्वांचे आवडते होते. १९ फेब्रुवारी १८७८ ला रामभक्त श्री. धुरंधर यांच्या पोटी त्यांचा जन्म झाला. त्यांचे घराणे प्रतिष्ठित होते. त्यांची जात पाठारे प्रभू होती. पाश्चात्य विद्येत ते पारंगत होते. ते ॲडव्होकेट झाले होते. ते तत्त्वज्ञानात निष्णात होते. विद्वान म्हणून त्यांची सर्वत्र ख्याती होती. पित्याचे दैवत राम होते, तर पुत्राचे आराध्य दैवत पांडुरंग होते. श्री. बाळारामांनी खूप समाजसेवा केली. स्वत: समाजवृत्तांतही लिहिला. संसार करता करता परमार्थाकडेही त्यांचा विशेष कल होता. त्यांनी श्रीमद्भगवद्गीता आणि ज्ञानेश्वरी यांची पारायणे करून त्यात प्राविण्य मिळविले होते. श्री बाबांची कीर्ती त्यांच्या कानावर आल्यानंतर प्रत्यक्ष दर्शन न होताही ते साईभक्त बनले होते. त्यांना श्री बाबांच्या दर्शनाची तीव्र ओढ होती; आणि एप्रिल १९१२ साली चांगला दिवस पाहून सर्व धुरंधर बंधू श्री बाबांच्या दर्शनाला यायला निघाले. ते येण्याच्या दिवशीच श्री बाबा म्हणाले, "आज माझ्या दरबारचे अनेक लोक यायचे आहेत". खरोखरच, ही मंडळी शिरडीस आली, तेव्हा श्री बाबा सर्वांसमक्ष म्हणाले, "मी तुम्हाला म्हटलं नव्हतं, माझ्या दरबारची खूप माणसं येणार आहेत म्हणून! तीच आलीत बरं का माझी ही माणसं!" श्री बाबांचे हे बोल ऐकून बाळारामादी सर्व बंधूंनी श्री बाबांच्या चरणाला मिठी घातली आणि ती सुरेख, अलौकिक मूर्ती देहभान विसरून ते पाहू लागले. तेव्हा त्यांच्या मस्तकावर अति प्रेमाने थोपटत श्री बाबा म्हणाले, "बापू, तुमची आमची आजचीच ओळख नाही बरं! चांगली साठ पिढ्यांची ओळख आहे म्हटलं! खूप दिवसांनी गाठ पडली. खूप खूप आनंद झाला. मी माझ्या अनन्य भक्तांची अशीच प्रेमाने वाट पहात असतो." सर्व धुरंधर बंधू विनम्रपणे हात जोडून श्री बाबांच्या चरणांकडे एकटक पहात होते. त्यांचे डोळे पाणावले होते. कंठ प्रेमाने दाटून आले होते. अंगावर रोमांच उभे राहिले होते. अष्टसात्त्विकभाव जागृत झाले होते. विशेषत: श्री बाळारामांची अवस्था इतरांहून जास्त हृदयस्पर्शी होती. श्री बाबा ते पाहून सुखावले. त्या प्रेमळ धुरंधर बंधूंशी ते

प्रेमाच्या गोष्टी करू लागले. म्हणाले, "शुक्ल पक्षाच्या चढत्या कलेप्रमाणे जो मला भजतो, त्याने आपला मनोधर्म मला समर्पित केला असून, तो धन्य होय! पूर्ण विश्वास ठेऊन जो आपल्या गुरूभजनी रमतो, त्याचा ईश्वरही सर्वार्थाने ऋणी होतो. त्यामुळे अशा भक्ताकडे कुणीही वाकड्या नजरेने पाहूच शकत नाही. जो आपल्या गुरूभजनाशिवाय क्षणभरही राहत नाही, वेळ फुकट घालवित नाही, त्याला त्याचा गुरू अमाप सुख देईलच; शिवाय भवसागरातून मोठ्या सौख्याने पैलतीरी नेईल." श्री बाबांचे हे अभयसूचक, सर्वार्थाने भरलेले उद्‌गार ऐकून सर्वांच्या नेत्रांत आनंदाश्रू आले. त्यांचे चित्त प्रसन्न झाले. श्री बाबांना नमस्कार करून ते वाड्यात आले. भोजनानंतर थोडी विश्रांती घेऊन परत द्वारकामाईत आले. त्यांनी श्री बाबांसमोर अक्षरश: लोटांगणही घातले. श्री. बाळाराम उत्कट प्रीतीने श्री बाबांचे पादसंवाहन करू लागले. एवढ्यात श्री बाबांनी चिलिम ओढून बाळारामांच्या हाती दिली. जन्मात कधीही त्यांनी चिलिम, विडी ओढली नव्हती; पण आपल्या सद्‌गुरूचा आदेश म्हणून आणि प्रसाद, ह्या भावाने कशीबशी कष्टाने ओढून श्री बाबांकडे परत केली. त्यांना नमस्कार केला. श्री. बाळारामांना यातले इंगित कळले नाही; पण तो त्यांचा भाग्याचा दिवस होता. श्री बाळारामांना दम्याचा विकार होता. त्यांना त्याचा खूप त्रासही होत होता. सद्‌गुरूचरणाजवळ येऊनही त्यांनी आपली ही व्यथा सांगितली नव्हती; पण श्री बाबा अंतर्ज्ञानी असल्याने त्यांनी चिलमीचे निमित्त करून त्यांची ही जिवघेणी व्यथा पूर्णपणे घालवली. जो दमा सहा वर्षे बाळारामांना त्रास देत होता, तो कानात मंत्र सांगावा, तसा चिलमीचा एक झुरका मारताच कायमचा गेला. मात्र मधेच एक दिवशी त्यांचा खोकला चाळवताच सर्वांना आश्चर्य वाटले. त्याच दिवशी श्री बाबांनी देह ठेवला होता. त्याची अशी खूण त्यांनी दाखविली. ज्यादिवशी श्री बाबांनी त्यांना चिलिम ओढायला दिली, त्या दिवशी चावडी मिरवणुकीचा सोहळा सर्व धुरंधर बंधुंना पहावयास मिळाला. पुढे सजवलेला श्यामसुंदर घोडा, शिरडीतले सगळे स्त्री, पुरूष व मुले श्री बाबांचा जयजयकार करीत चालले होते. शिंगे, कर्णे, तुताऱ्या वाजत होत्या. पालखी सजवलेली होती; आणि भक्त मंडळीबरोबर श्री बाबा चालत होते. भक्तांनी त्यांच्या मस्तकावर छत्री धरली होती. भजनी मंडळी भजन करीत होती. दक्षिण बाजूला म्हाळसापती भगत व उत्तर बाजूला बाबांचा लाडका तात्या पाटील हातात कंदिल घेऊन चालत होते. आधीच बाबा तेजस्वी, त्यात दिव्यांचा प्रकाश, त्यामुळे ते अधिकच तेजस्वी दिसत होते. श्री बाबा चावडीत गेल्यावर त्यांना सन्मानाने बसवले गेले. दिव्य वस्त्रालंकार घातले गेले. अंगाला चंदन लावले गेले. कुणी पाय धूत होते. कुणी पूजा करीत होते. मुखात विडाही कुणी घालत होते. कुणी पंचारती ओवाळीत होते. त्यावेळचा तो सोहळा पाहून धुरंधर मंडळी आश्चर्यचकित होऊन म्हणाली, आज आम्ही कृतार्थ झालो. डोळ्यांचे अगदी पारणे फिटले. दुसऱ्या दिवशी

पहाटे काकडआरतीच्या वेळी ही मंडळी द्वारकामाईत गेली, तेव्हा आपण श्री पांडुरंगालाच पहातोय, असे बाळारामांना वाटले. त्यांनी श्री बाबांना साष्टांग नमस्कार घातला. पुढे श्री बाबांची आज्ञा घेऊन त्यांची मूर्ती नयनात साठवून जड अंतःकरणाने त्यांनी शिरडी सोडली.

---

## श्रीसाई अष्टोत्तरशतनमस्क्रिया

श्रीसाईनाथं शिरसा नमामि श्रीसाईनाथं मनसा स्मरामि।
श्रीसाईनाथं लक्ष्मीनारायणं कृष्णरामशिवमारुत्यादिरूपम्।
गोदावरीतटशीलधीवासिनं भक्तहृदयालय-शेषशायिनम्।१।
सर्वहृन्निलयं त्वां भूतावासं भूतभविष्यद्भाव वर्जितम्।
कालं कालातीतं कालकालं कालदर्पदमनं मृत्युंजयम्।२।
जीवाधारं सर्वाधारममर्त्यं मर्त्याभयप्रदं अन्नवस्त्रदम्।
भक्तावनसमर्थं नित्यानन्दं भक्तावनप्रतिज्ञं परब्रह्म।३।
आरोग्यक्षेमदं ऋद्धिसिद्धिदं धनमांगल्यप्रद-परमसुखदम्।
प्रियं पुत्रमित्रकलत्रबन्धुदं आपद्बान्धवं योगक्षेमवहम्।४।
भुक्तिमुक्तिस्वर्गापवर्गदं च प्रीतिवर्द्धनं त्वामन्तर्यामिणम्।
सच्चिदात्मानं परमेश्वरं च परमात्मानं ज्ञानस्वरूपं नमामि।५।
जगतः पितरं भक्तपराधीनं मातृधातृपितामहं भक्तानाम्।
भक्ताभयप्रदं भक्तिशक्तिप्रदं भक्तानुग्रहकारकं स्मरामि।६।
शरणागतवत्सलं प्रेमप्रदं ज्ञानवैराग्यदं शुद्धसत्त्वस्थितम्।
संशयहृदयदौर्बल्यपापकर्मवासनाक्षयकरं मार्गबन्धुम्।७।
हृदयग्रन्थिभेदकं अर्थिनं कर्मध्वंसिनं अमितपराक्रमम्।
गुणातीतगुणात्मानं सुलोचनं अनन्तकल्याणगुणं अचिन्त्यम्।८।
दुर्धर्षाक्षोभ्यं अपराजितं च त्रिलोकेषु त्वामविघातगतम्।
अशक्यरहितं सर्वशक्तिमूर्तिं सुरूपसुन्दरं अरूपाव्यक्तं च।९।
बहुरूपविश्वमूर्तिं वासुदेवंसर्वान्तर्यामी मनोवागतीतम्।
सूक्ष्मं सुलभदुर्लभं च तीर्थं प्रेममूर्तिं असहायसहायम्।१०।
अनाथनाथमम दीनबन्धुं सर्वभारभृन्तं सत्परायणम्।
अकर्मानेककर्मसुकर्मिणं त्वां पुण्यश्रवणकीर्तनं सतागतम्।११।
ब्रह्मचर्यतपश्चर्यादिसुव्रतं लोकनाथं पावनानघमं नमामि।
अमृतांशवं भास्करप्रभं त्वां सत्यधर्मपरायणं नमामि।१२।
सिद्धेश्वरं सिद्धसंकल्पं नमामि योगेश्वरं भक्तवत्सलं स्मरामि।
भगवन्तं त्वां पुरुषोत्तमं च सत्पुरुषं सत्यतत्त्वबोधकम्।१३।
कामादिषड्वैरिविध्वंसिनं त्वां अभेदानन्दानुभवप्रदं च।
समसर्वमतसंमतं साईशं दक्षिणामूर्तिं वेंकटेशरमणम्।१४।
अद्भुतानन्दचर्यं प्रपन्नार्ति-हरं संसार-सर्वदुःखक्षयकरम्।
सर्ववित्सर्वतोमुखं सर्वान्त-र्बहिःस्थितं सर्वमंगलकरम्।१५।
सर्वाभीष्टप्रदं त्वां साईनाथं समरससन्मार्गस्थापनं नमामि।
श्रीसमर्थं सद्गुरु साईनाथं शिरसा नमामि मनसा स्मरामि।१६।

– डॉ. सुधांशु कुमार नायक

---

# देवो भव

- श्री. दिगंबर सारंगधर बुलबुले
इतवारा, नांदेड.

''मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्य देवो भव'' हा धर्मराजाला भीष्मांनी केलेला उपदेश आहे.

निर्गुण निराकार परमात्मा दिसत नाही, तेव्हा आम्हाला दिसणारे देव म्हणजे आई, वडील व गुरु होत. या चालत्या, बोलत्या, दिसत्या व रोज सहवासात राहणाऱ्या देवांची सेवा ही महत्वाची आहे.

यांच्या सेवेने इहलोकी व परलोकी श्रेष्ठतम सुख प्राप्त होते. ही त्रयी म्हणजे तीन आश्रम, तीन वेद, तीन अग्नी होत. म्हणूनच त्यांचा आदर करावा, त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानावी.

या तिघांपैकी मातृदेवता प्रथमस्थानी मानलेली आहे. सर्वात निर्मल व विशुद्ध भाव जगात पहावयाचा असेल, तर तो मातृभाव आहे.

विश्वात एकमेकांचे प्रेम आम्ही बघतो. हे परस्परांचे प्रेम सापेक्ष असते; पण आईचे अपत्यावरील प्रेम निरपेक्ष असते. आईचे मुलावरील प्रेम इतके निरपेक्ष व स्वाभाविक असते की, त्याला जगात उपमाच नाही. फक्त परमात्म्याच्या दयालुत्वाशी त्याची काही अंशी तुलना करता येईल. आईचे प्रेम अहेतुक असते. अपत्याचे संगोपन, संवर्धन, सांभाळ व त्याचे सर्वस्वी चांगलं करण्याची तिची धडपड एवढी असते की, आपण तिच्या या ऋणांतून कधीच मुक्त होऊ शकत नाही. ह्या वत्सलतेमधून ती उपकाराची फेड कधीच मागीत नाही. मोबदला तर दूरच, प्रसंगी स्वतःचे प्राणार्पण करून अपत्याचे सुख तिला हवे असते. म्हणूनच आईला आद्य व प्रथम दैवत मानले जाते.

आईचे प्रेम व आशीर्वाद हे मुलाला लाभणारे अभेद्य कवच असते. आईचा आशीर्वाद हा लाख मोलाचा असतो. त्यात जीवाचे परम कल्याण साठलेले आहे. आईचे उपकार फेडणारा जीव जगात जन्मावयाचा आहे.

आईच्या नंतर जन्मदात्या पित्याचे स्थान आहे. वडिलांचे गुण मुलात उतरतात. मुलातले सद्गुण व त्याची थोरवी गाताना लोक त्याच्या वडिलांचाच गौरव करतात. कुणाचा मुलगा आहे हा ? असा प्रश्न केला जातो. नऊ महिने आईच्या कुशीत राहतो, ओळखला मात्र जातो तो वडिलांच्या नावाने. जीवनक्रम सूत्रबद्ध चालण्यासाठी

पित्याची आज्ञा पाळणे, अपत्याचे परम कर्तव्य आहे. पित्याबद्दल आदर असतो, तो त्यांच्या भीतीमुळे; कारण मुलाने कर्तव्यपरायण व्हावे, अशी पित्याची इच्छा असते. मुलगा स्वावलंबी व्हावा, म्हणून कठोर कर्तव्य करावयाला तो भाग पाडतो. जीवनात यशस्वी व्हावे, यासाठी अपत्याला शिस्त व वळण लावणे, पित्याचे काम आहे. जो हे वळण लावतो, शिक्षण देतो व सर्व जीवन उजळून टाकतो, तो पिता म्हणूनच आदरणीय व वंदनीय ठरतो. म्हणूनच त्याची आज्ञा पाळणे व त्याचा शब्द पाळणे, हे परम कर्तव्य आहे. पित्याचे हे ऋण मात्र प्रयत्नपूर्वक फेडता येते. अशा वडिलांची मर्जी मुलाला सांभाळावी लागते.आईचे ऋण मात्र काहीही केले, तरी फिटत नाही.

पित्यानंतरचा क्रम गुरुचा आहे. पिता वळण लावून प्राथमिक जीवनास सुरूवात करुन देतो. गुरुची भूमिका मात्र याहूनही थोर आहे.

आर्यांच्या संस्कृतीत गुरुला अनन्यसाधारण स्थान आहे. गुरुचे स्थान देवापेक्षाही श्रेष्ठ मानले आहे. माय-बाप संसाराची चिंता वाहतात ; पण गुरु संसाराच्या पलिकडील शाश्वत सुखाची प्राप्ती करून देतो.

परम अमृताप्रमाणे मधुर जीवन पुष्ठ करणारे स्वतःचे दूध मुलाला पाजविणारी आई श्रेष्ठच आहे; पण पुन्हा दूधच पिण्याची पाळी न येऊ देणारा गुरु हा सर्वश्रेष्ठ सखा आहे. माय-बाप संसारी पालन करतात, तर गुरु हा संसार संपवून पुन्हा जन्मालाच येऊ देत नाही. गुरु हा सावलीप्रमाणे शिष्याच्या मागे-पुढे राहून त्याचे परम कल्याण करतो. संकटसमयी दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करतो. गुरु नुसता परमार्थच सजवीत नाही, तर संसारातही शिष्याची फजिती झालेली त्याला आवडत नसल्यामुळे तो नेहमी दयाळूत्यानेच शिष्याचे हित पाहतो. गुरु मोक्ष देतो. मोक्ष म्हणजे सुटका. जन्म-मरणाच्या फेऱ्यातून कायमची सुटका म्हणजे मोक्ष. जन्मालाच न आला, तर जगतानाचे व मृत्यूचे दुःख कायमचे दूर होते ; म्हणून गुरुचा शब्द म्हणजे वेद. त्याची आज्ञा म्हणजे इंद्राचे वज्र. गुरु परमेश्वराची प्राप्ती करून देतो. प्रत्यक्ष परमेश्वर कधीच प्रसन्न होत नाही. त्यासाठी गुरुचे माध्यम हवे. गुरु मध्यस्थी करतो. देव रागावला, तर गुरु त्याला प्रसन्न करून देतो ; पण गुरु रागावला, तर गुरुही गेला व देवही गेला. गुरु जीवनातील अंधःकार दूर करतो. जीवन कृतार्थ करण्याचा बोध करतो. अश्या गुरुचे ऋण फेडणे हजारो जन्मांतही शक्य नाही.

आम्हाला "भव" नावाचा जो संसार रोग लागलेला आहे, त्या रोगाला दूर करणारा गुरु हा निष्णात वैद्य आहे. गुरु हा मनुष्य नाही, व्यक्ती नाही, नुसता चालता-बोलता हाडामासाचा पुतळा नाही, तर ती एक महानशक्ती आहे.

गुरुकृपेनेच रोजच्या साधनेला बल प्राप्त होते. केलेले कर्म सफल होते. देवावरची निष्ठा अढळ राहते. वृत्ती स्थिर होते. मन शांत होते. जीवन कृतार्थ होते. ध्येय प्राप्त होते. शेवटी परमेश्वराच्या दिव्य तेजात तेजोमय होऊन विलीन होता येते.

म्हणून जन्माला येणाऱ्या प्रत्येकाने तिघांचे महत्व ओळखून जीवनक्रम आखावा व जन्माला येण्याचे सार्थक करावे.

# दार उघड साई

उघड दार साई
आता दार उघड साई
पाठी लागले संचित
धावू किती बाई॥धृ॥

काम क्रोधाचा हो ज़ोर
जीव जाहला अधीर
पाय चुके झाली घाई
उघड दार साई॥१॥

मन धावे सैरावैरा
चढे क्रोधाचाही पारा
द्वाड सुटे ना सवयी
उघड दार साई॥२॥

किती किती विनवू देवा
करु किती तुझा धावा
होईन मी उतराई
उघड दार साई॥३॥

तुझी कृपा मज व्हावी
जन्म मरणे मिटावी
फिरवावी तुझी द्वाही
उघड दार साई॥४॥

तुझी कृपा थोर ठेवा
नित्य हृदयि मी जपावा
पुन्हा गुंतावे न मोही
उघड दार साई॥५॥

– सौ. नीता उल्हास जाधव



# तुमचा मी भार वाहीन सर्वथा.....

- प्रा. श्री. आय्. पी. अुमराणी
लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

संसारताप विसरून अंत:करणाला निरंतर समाधान मिळवून देण्याचा एकमेव मार्ग म्हणजे ईश्वरभक्ती होय! नित्य सुख, शांती हवी असल्यास "**आत्मा वा अरे द्रष्टव्य: श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्य:**", असे संतांनी सांगितले आहे. आत्मदर्शन करून घ्या; त्याचे श्रवण व नित्य मनन करा; त्याचा निदिध्यास लावून घ्या, असा त्यांचा उपदेश आहे. अलिकडील काळात आत्मदर्शन करून घेण्याचा मार्ग हा सर्वसुलभ राहिलेला नाही. तथापि, अनेक अवतारी पुरुषांनी सुलभ भक्तिमार्ग दाखवून दिलेला आहे. ह्या अवतारी पुरुषांपैकीच श्री साईबाबा हे एक होत.

भक्तांच्या अंत:करणांतील खरी तळमळ, एकनिष्ठता आणि कसोटी पहाण्याचा हा सद्‌गुरुंचा मार्ग असतो. साईबाबा हे कोण होते, याचे जरी गूढ असले, तरी त्यांच्या 'सबका मालिक एक' या उपदेशाप्रमाणे आपल्याला एवढेच म्हणता येईल की, विश्वातील सर्व जाती-धर्मातील लोकांना आत्मदर्शनाबरोबरच त्यांना अध्यात्मप्राप्ती करून देण्याकरिता मार्गदर्शन करण्यासाठी व प्रत्येकाला ईश्वरप्राप्तीचा मार्ग दाखवून मानव धर्माची अत्यंत पवित्र आणि सनातन सत्य मूल्ये ह्या कर्मभूमीवर रूजविण्यासाठी त्यांनी साक्षात् परमेश्वराचा अवतार घेतला. बाबांनी दयाळू अंत:करणाने सर्व भक्तांचे रक्षण केले. आपल्या बालकाच्या हातून जरी अपराध घडला, तरी आई त्याला प्रेमाने पदराखालीच घेते; त्याचप्रमाणे बाबांच्या मनात वात्सल्य पूर्णपणे भरलेले होते. मनाचा फारच संताप झाला, म्हणजे ते शिव्यांची लाखोली वाहत. शयनागारातून मशिदीत जाण्याच्या वेळी हातातील दंडा जोरजोराने फिरवून तोंडातून लाखों शिव्या देताना पुष्कळ भक्तांनी त्यांना पाहिलेले आहे. परंतु चमत्कार असा की, त्यावेळी मोठमोठ्याने शिव्या देण्याच्या आवेगात प्रत्येक क्षणी "अल्ला तेरा अच्छा करेगा" अशी अत्यंत आर्द्र, स्पष्ट वाणी ऐकू येत असे. अगदी रागाच्या भरात देखील बाबा शांतपणे समोर आलेल्या भक्ताला प्रेमळपणे आशीर्वाद देत असत.

बाबांच्या समोर आलेल्या कोणाहीं दुष्ट, अमंगल माणसाचे मन ते भारून टाकीत. बाबांचे मोजके, तुटक शब्द अत्यंत बहुमोलाचे आणि सदुपदेशाचे असत. एकदा आरती संपल्यावर बाबा आपल्या शांत व गंभीर आवाजात तेथे जमलेल्या भक्तांना म्हणाले, "तुम्ही कोठेही असा, काहीही करा; पण एक गोष्ट सदैव लक्षात ठेवा की, तुमच्या बऱ्या-वाईट सर्व गोष्टी मला त्वरित कळतात. मी सर्वांच्या अंतर्यामी

जाऊन विश्वातील सर्व चल आणि अचल वस्तूंना परमेश्वराच्या हुकूमाने सूत्रधार म्हणून गती देतो.'' बाबांने अंतर्ज्ञानाने सर्व काही कळते, ही भावना भक्तांच्या मनावर पूर्णपणे ठसून असे. मनात नुसता वाईट विचार आला आणि आपण तो कोणाजवळही बोलून दाखविला नसला, तरी साईनाथांना तो पूर्णपणे कळतो, याची आंतरिक जाणीव झाली, म्हणजे सहजपणे भक्ताच्या मनावर त्याचा परिणाम होई व त्याच्या आचरणाची आणि मनाची तीर्थस्नान केल्याप्रमाणे शुद्धी होई.

भक्तांना बाबांविषयी जितकी ओढ वाटत होती, त्यापेक्षा कितीतरी अधिक पटींनी बाबांना आपल्या भक्तांविषयी प्रेम वाटत असे. ते आपल्या भक्तांना म्हणत असत की, ''संसारात प्रत्येकाला सुख-दुःखे ही सहन करावी लागणारच; पण माझ्या एकनिष्ठ भक्ताला कुटुंबनिर्वाहासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींची मी कधीही कमतरता भासू देणार नाही. एकनिष्ठेने व श्रद्धेने आपल्या इष्ट देवतेची आराधना करा. मनाची एकाग्रता व समाधीची पूर्वस्थिती प्राप्त करून घेण्याकरिता आपले मन नेहमी सद्विचारांकडे वळविले पाहिजे. सदाचाराने वागणाऱ्या मित्रांची संगत ठेवली पाहिजे.'' म्हणून बाबा आपल्या अधिकार वाणीने असे म्हणतात की, ''तुमचा मी भार वाहीन सर्वथा, नव्हे हे अन्यथा वचन माझे''. बाबांचे हे उद्गार म्हणजे भक्तांकरिता एक अमृतनिधीच म्हणावा लागेल.

# जया मनी जैसा भाव....

- श्री. माधवराव भागवत
वर्तकनगर, ठाणे.

**भेटी लागी जीवा। लागलीसे आस**
**वाट पाहे तुझी देवा। पंढरीचा दास॥१॥**

संतदर्शन, संतभेट ही फार दुर्लभ अशी गोष्ट आहे. आपले पूर्वसुकृत चांगले असेल, भक्तीच्या बँकेत आपला पुण्यरूपी पैशांचा भरपूर संचय असेल, तरच संतदर्शन, संतभेट होते, असे म्हणतात. लहानपणापासून माझा देवाधर्माकडे ओढा होताच, त्यातच मला साधू, संत, अवलिया, फकीर यांचे दर्शन घेण्याचा छंद जडला. अन् अभिमान म्हणून सांगत नाही, आतापर्यंत पुष्कळ संतांच्या दर्शनाचा योगही आला. अर्थात, ती माझी गेल्या जन्मीची पूर्वपुण्याई असेल अथवा पूर्वसुकृत चांगले असेल, म्हणूनच केवळ हे घडले. त्याचा परिणाम असा झाला की, संतभेटीची ओढ दिवसेंदिवस वाढतच आहे. कितीही संतदर्शन घेतले, तरी ती इच्छाच पुरी होत नाही.

एखाद्या धनलोभी माणसासारखी माझीही परिस्थिती झाली आहे. धनलोभ्याने कितीही धन कमाविले, तरी तृप्ती होत नाही, तसेच माझेही झाले आहे खरे! वयोमानाप्रमाणे म्हणा अथवा अन्य काही कारणांमुळे म्हणा, आता मला इतर वाचनांपेक्षा आध्यात्मिक वाचनात फार गोडी वाटते. आध्यात्मिक वाचनाने संसाराच्या रहाटगाडग्याचे विस्मरण होते, मनाला शांती मिळते.

एकदा माझे परममित्र श्री. घ. का. दवणे यांच्या घरी गेलो होतो. समोरच भिंतीवर एक फोटो दिसला. चौकशी केली, तर कळले की, ते माझे परममित्र श्री. दवणेंचे ''गुरु'' आहेत व भिवंडीलाच त्यांचे ''समाधी मंदिर'' आहे. ''नाथ मंदिर'' या नावानेच ते प्रभू आळी व भिवंडीत परिचित आहे. माझ्या मित्रांनी त्यांच्या पूज्य गुरुंचे ''चैतन्य नाथांची चाहूल'' हे श्रीमती इंदूताई द. टिपणीस यांनी लिहिलेले चरित्रच दाखविले. सुमारे २२५ पानांचे आकर्षण, सुंदर रंगीत चित्र असलेले, भाऊरायांच्या कारकिर्दितील दुर्मिळ छायाचित्र असलेले ते पुस्तक पाहून मला अतीव आनंद झाला. साहजिकच ते वाचण्याची इच्छा अनावर झाली. श्री. दवणे यांच्याकडे मी मागणी केली. अन् कुठल्याही तऱ्हेचे आढेवेढे न घेता त्यांनीही तो चरित्रग्रंथ मला वाचायला दिला.

तो ग्रंथ वाचल्यावर माझ्यासमोर जर कोण उभे राहिले असेल, तर ते म्हणजे ''श्री संत एकनाथमहाराज'', ज्यांनी भागवत धर्माची पताका फक्त महाराष्ट्रातच नव्हे, तर उत्तरेस पंजाबपर्यंत फडकविली. माझ्या आध्यात्मिक प्रवृत्तीच्या मनात साहजिकच इच्छा निर्माण झाली की, अशा थोर संतपुरुषाचे दर्शन जवळ असून सुद्धा माहीत नसल्याने होऊ शकले नाही, निदान त्यांच्या समाधीचे दर्शन घ्यावे, भक्तीच्या दरबारातील त्या मानकऱ्याला मुजराही त्याला साजेसाच केला पाहिजे, असे वाटले. श्री मद्सद्गुरु माऊली श्री भाऊराय वारकरी पंथाचे होते. माझे ज्येष्ठ स्नेही व श्री. भाऊरायांचे सत्शिष्य श्री. भास्करराव समर्थ की ज्यांचे वय अंदाजे ६५ वर्षांचे आहे. त्यांच्या मनात केव्हाही गुरुदर्शनाची ओढ निर्माण झाली की, ते पायी वारी करूनच भिवंडीला गुरुसमाधीच्या दर्शनाला जातात. वार्षिक जयंती, पुण्यतिथी व इतर अनेक उत्सवांनाही पायीच वारी करून जातात. इतके वयोवृद्ध स्नेही जर पायी वारी करून जाऊ शकतात, तर मला ते का जमू नये, हा एक हेतूही त्या मागे होताच. त्याप्रमाणे मी पायी वारी करून अखेर दर्शन घेतलेच. वारकरी आपले आराध्य दैवत जे ''पांडुरंग'', त्याला भेटायला पायी वारी करून जातात; तेव्हा मलाही त्यांच्या दर्शनाला पायी वारी करूनच गेले पाहिजे, असा विचार मनात आला आणि त्याप्रमाणे मी ग्रंथ वाचल्यावर वरील संकल्प केला. कुणी आला, तर सह, नाहीतर एकला

चलो रे! मनाने केलेले सारेच संकल्प पुरे होत नाहीत; म्हणूनच संकल्प अन् सिद्धि यांत फार अंतर असते. काय योगायोग पहा! त्याआधीच १९८८ च्या गुरुपौर्णिमेच्या दिवशी माझे मित्र श्री. दवणे यांच्याबरोबर मी "भिवंडीचे तुकाराम" श्री भाऊराय यांचे दर्शन (समाधीचे दर्शन) एस्.टी. ने घेऊन आलो खरा, पण मन अशांतच होते. मनात सल होता, टोचणी होती की, केलेली प्रतिज्ञा मी पुरी करू शकलो नाही. आध्यात्मातला, परमार्थातला एक अलिखित नियम आहे, सच्च्या साधकाने कधी खोटे बोलू नये.

श्री मद्सद्गुरु श्री भाऊरायांचे भेटीसाठी, दर्शनासाठी, पाण्याविण मासा जसा तडफडतो, तसा मी तडफडत होतो. पाण्यावाचून जीव कसा व्याकूळ होतो, तसा मी भेटीसाठी व्याकुळलो होतो. त्यातून माझ्या साईनाथांनी ज्यांचा सत्कार केला, ती विभूती किती महान असेल, किती उच्चाधिकारी असेल, ह्या विचारांनी माझी तार जोडली गेली. नाथ, एकनाथ, साईनाथ ही दुसरी गोष्ट तार जोडण्याला पुरेशी होती. माझ्यासारख्या आध्यात्मिक प्रवृत्तीच्या मनाची भक्तिविणा छेडली गेली, त्वरित झंकारली, तर त्यात नवल ते काय!

सामान्यजनांची जशी संतभेटीसाठी मने आतुरलेली असतात, तशी ती असामान्यजनांची, ज्यांना आपण संत, सत्पुरुष, महात्मे, साधू, अवलिया, फकीर म्हणतो, त्यांचीसुद्धा आतुरलेली आसतात; कारण संतांच्या मनात द्वैतभाव, मी-तूपण नसतेच, त्यांचे संपूर्ण अुच्चाटन झालेले असते. म्हणूनच ते पराकोटीला गेलेले असतात. एकमेकांचा आध्यात्मिक अधिकार, योग्यता जाणून असतात. संतभेटीवरून गोष्ट आठवली, म्हणून आपल्याला एक दुर्मिळ, अनुपलब्ध, अपरिचित, अज्ञ, अशी सुंदरशी गोष्ट ज्ञात व्हावी, म्हणूनच या लेखाचा प्रपंच मांडला आहे.

१९१० सालची गोष्ट आहे ती. त्यावेळी आपले साईनाथ हयात होते. "भिवंडीचे तुकाराम" श्री संतमाऊली शांताराम भाऊ जयवंत उर्फ भाऊराय यांचे गुरुवर्य भिवंडीचेच महान संत. साईनाथांचे समकालीन श्री राममारुती महाराज यांच्या महानिर्वाणानंतर अवघ्या पंधरवडयाने, म्हणजे आश्विन शुद्ध दशमीस (दसरा) श्री साईबाबांनी आपले अवतारकार्य संपवले. जाता जाता आपल्या दोन-तीन साईभक्तांना साईनाथांनी खूण देऊन सांगितले की, मी अन् राममारुती एकच आहोत. अन् देहाने ते लुप्त झाले. साईनाथांच्या समाधीचे वृत्त ऐकून भाऊरायांना फार दुःख झाले.

१९१० साली श्री सद्गुरु भाऊराय दोन मुसलमान युवकांना बरोबर घेऊन शिर्डीला गेले होते. त्यावेळी साईनाथ शरीररूपाने हयात होते. त्यावेळी शिर्डी संस्थानचा विस्तारही आतासारखा झालेला नव्हता. साईबाबा मशिदीतच राहात. हे तीन तरूण

मोठ्या आशेने, तळमळीने दर्शनासाठी गेले व भाग्य म्हणजे, अल्पावधीतच श्री साईनाथांची मूर्ती मशिदीत बसलेली दिसली. श्री साईनाथांच्या अंगावर, सर्वांगावर विलक्षण तेज विलसत होते. कांती तांबूस गुलाबी होती. अंगात कफनी, डोईस रूमाल, असा पेहराव होता. जवळच धुनी पेटलेली होती. साईनाथांचे दर्शन तिघांनाही झाले; पण भाग्य मात्र उजळले होते श्री भाऊरायांचे. त्यांना पहाताच श्री साईनाथ एकदम ओरडले, शाम्या, अरे शाम्या! त्याला खोलीत कोंड! ते शब्द सर्वांनाच चमत्कारिक वाटले. भाऊरायही थोडे चमकले, थोडे दचकलेही. श्री बाबांच्या डोळ्यात मात्र तेज होते. विनोदाची झाक होती. चेहरा प्रसन्न होता. बाबांचा हुकूम होताचक्षणी आतले लोक श्री भाऊरायांना कोंडून ठेवण्याच्या व्यवस्थेला लागले. त्यांनी भाऊरायांना आत नेले. ते गोंधळून गेले होते. पण काय आश्चर्य! आत त्यांना एका प्रशस्त खोलीत ठेवून त्यांची अगदी ''राजासारखी'' बाडदास्त ठेवण्यात आली. त्यांच्या खाण्यापिण्याकडे, उठण्याबसण्याकडे बाबा लक्ष देत होते. त्यांना तोंड धुण्यास पाणी दिले. चहापाणी झाले. स्नानाची चोख व्यवस्था करण्यात आली. भाऊराय हा पाहुणचार भोगण्याच्या मनःस्थित नव्हते. अखेर शामरावांनी त्यांना साईनाथांकडे नेले, तेव्हा बाबांनी प्रेमाने त्यांना जवळ बोलावून धुनीतील उदी घेतली व ती भाऊरायांच्या मस्तकावर चोळून सर्वांगाला लावली. नंतर त्यांच्या पाठीवरून हात फिरवित म्हणाले, अल्ला तेरा भला करेगा! त्या कृपाकटाक्षाने भाऊराय अक्षरशः गहिवरले. नेत्रांतून त्यांच्या अश्रू ओघळू लागले. सद्‌गदित होऊन साईनाथांच्या चरणांवर त्यांनी मस्तक ठेवले. त्याचक्षणी साईनाथ त्यांना अधिक राहण्याचा आग्रह करू लागले. भाऊरायांना मात्र रहायला सवडच नव्हती.

पुढील आयुष्यात भाऊराय नेहमी एक श्लोक म्हणत असत–

**दुर्लभो मानुषो देहः, प्राणीनां क्षणभंगुरः।**
**तत्रापि दुर्लभं मन्ये, वैकुंठप्रियदर्शनम्।।**

खरोखरच भाऊरायांच्या वाट्याला जे भाग्य आले, ते सर्वांच्याच बाबतीत दुर्लभच होते. काही वर्षांनी भाऊराय पुन्हा शिर्डीला गेले, तेव्हा बाबांचे उदार आशीर्वचन त्यांना आठवले. भावनावेगाने भाऊराय म्हणाले, आता असे कोण बोलणार! आता अंगावरून उदीचा हात कोण फिरविणार! ह्या विचारांनी ते विव्हळ झाले; परंतु थोड्याच वेळात बाबांनीच जणू त्यांना शांत केले, समाधीवर भाऊरायांनी मस्तक ठेवताच काही वेळाने ते शांत झाले. अशी झाली स्थिती संतभेटी. म्हणूनच साईनाथ म्हणतात, जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव। आणि हे त्यांचे म्हणणे किती सार्थ आहे, हे वरील गोष्टीवरून कळून येईल.

# मारितो मी हांक बाबा

मारतो मी हांक बाबा, मारतो मी हांक रे
ध्यास तुझ्या चरणी लागो, हीच मनीं आंस रे
शिर्डीग्रामी करूनी वस्ती
धुनी ठेविली जागती
दर्शनानें समाधीच्या
उचंबळते मनी भक्ती
तृप्त करीं तेज मुखाचे, तसें तुझे हास्य रे
ध्यास तुझ्या चरणी लागो .................................. ॥१॥
संसारी या शीतल शांती
नित्य असो प्रेम
सदाचार साधू सेवा
हाच वसो नेम
तुझ्या पदी निष्ठा राहो असो तुझा धाक रे
ध्यास तुझ्या चरणी लागो.................................... ॥२॥
आंस भाविकाची पुरवा
मन पदी जडवून ठेवा
भेदभाव सरू दे सारा
प्रेमवृक्ष यावा बहरा
जागृतीत स्वप्नी स्मरू दे तुझा सहवास रे
ध्यास तुझ्या चरणीं लागो, हीच मनीं आंस रे

- **श्री. सुधीर आपटे**
पुणे.

# देव आणि धर्म

● बालसाईभक्तांनो, जगात एकच देव असताना एवढे असंख्य धर्म पंथ वा मार्ग कसे निर्माण जाले, याचे तुम्हाला नवल वाटत असेल नाही ? या विश्वाच्या पसाऱ्यात एकच परमेश्वर भरुन असला तरी निरनिराळे देश, समाज, जातीजमातींनी त्याला आपल्या कल्पनेनुसार वेगवेगळी नावे व रूपं दिलेली आहेत. या देवाला आपल्या आवडीनुसार वेगवेगळे गुण, आयुधे व शक्ती माणसाने प्रदान केल्या आहेत. व्यक्ति तितक्या प्रकृती या न्यायाने जगात वेगवेगळे देव व धर्म निर्माण झाले आहेत.

● जगातील थोर साक्षात्कारी महात्म्यांनी विश्वाच्या कल्याणासाठी व मानवतेच्या उद्धारासाठी अविरत प्रयत्न केलेले आहेत. असे करताना त्यांनी जगामागील एकच परमेश्वर पाहिला, जाणला व अनुभवला आहे. धर्म म्हणजे सद्गुणसंपन्न व मानवतावादी जीवनाचा एक मार्ग आहे. या मार्गाने चालताना आपण स्वत:चा संपूर्ण विकास करुन घेऊ शकतो तसेच इतरांनाही विकास करून घेण्यास मदत करीत असतो.

● श्री साईबाबा, रामकृष्ण, अरविंद, कबीर, नानक, रमणमहर्षी यांसारख्या थोर संत महात्म्यांनी प्रेम व करुणेने ओथंबणाऱ्या एकच परमेश्वराची आराधना केली. त्यांच्या दृष्टीने पवित्र जीवन जगणेच परक्याची सेवा करणे, हीच साधना होती व धर्माचा सर्वोत्तम पंथ होते जगातील स्त्री-पुरुषांनी धर्माचा हा संदेश अवमानून अज्ञानाचा मार्ग स्वीकारला आहे आता ते प्रकाश व कृपा यांची आळवणी करीत आहेत, माणसे स्वार्थाने जीवन जगत आहेत व धन, मान, कीर्ती, वासना व सत्ता यांच्यामागे धावत, पळत आहेत व शेवटी दु:खाच्या गर्तेत अडखळून पडत आहेत. जगात लागलेल्या नवनवीन शोधांवरोबर माणसाची सुसंस्कृत जीवनाच्या मार्गावर प्रगती झालेली नाही. नवीन शोधावरोबरच मानव अधिकाधिक स्वार्थ-केंद्रित बनत चालला आहे.

● जेव्हा आम्ही साधना केली पाहिजे, असे म्हणतो, तेव्हा या स्वार्थी व आत्मकेंद्रित जीवनापासून दूर जाण्यास व इतरांच्या हितासाठी झटण्याचा विचार करावयास आम्ही उत्सुक आहोत, एवढाच अर्थ होतो. प्रत्यक्षात आम्हाला आमच्या वाईट सवयी व दुर्गुण यांचा त्याग करीत गुणी व सचोटीचे जीवन आचरणात आणावयास हवे. आम्ही अशी कृती करायाची आहे की, आम्ही स्वत:चा अभ्युदय करूच ; पण इतरांचेही हित जपू. आम्हाला यामध्ये शांती व सुसंवाद लाभेल. नाम व रुपावर ध्यान करुन आम्ही प्रभुरूप झाले पाहिजे. यातून आम्ही खऱ्या देवाकडे जाऊ. हा एकच देव साऱ्या विश्वाचा एकमेव त्राता आहे. जो ईश्वर विश्वात भरलेला आहे, तो आमच्या

हृदयातही प्रकाशरूपानं वसत असतो. या प्रकाशाचा आपण साधनेतून शोध घ्यायचा असतो व शुद्ध व पवित्र कृत्याद्वारे त्या प्रकाशाला जीवनात प्रगट करावयाचे असते. या प्रकाशाचे हळूहळू विश्वात्मक महाप्रकाशामध्ये, म्हणजे विश्वात्मक देवामध्ये मीलन घडवायचे असते. हा प्रकाश म्हणजेच परमेश्वर; हा शांति, सुख व आनंदरूप आहे; हाच सत् चित् आनंद आहे.

# शिरडीतील एक अनोखा सोहळा

बालसाईभक्तांनो, एकमेकांचा द्वेष केल्यानं की नाही फायदा तर काही होत नाहीच, उलट दोघांचाही होणारा विकास खुंटतो. वैरभावामुळे दोघांच्याही मनात आपण दुसऱ्याचा सूड कसा घ्यायचा, हाच विचार सतत घुमसत असतो; त्याचा परिणाम असा होतो की, इतर चांगल्या गोष्टी करण्याकडे त्यांचं लक्षच मुळी कसलं ते लागत नाही. माणसाची प्रगती जर व्हायची असेल, तर संघर्ष टाळून विचारांची देव-घेव हवी, एकमेकांना समजून घेण्याची वृत्ती हवी. असं झालं ना की मग साहजिकच वेगवेगळ्या धर्मातले, भिन्न-भिन्न जातीतले लोक गुण्या-गोविंदानं कसे मजेत राहतात. बालसाईभक्तांनो, आपल्या बाबांनी की नाही ह्याचकरिता कित्येक वर्षांपूर्वी म्हणजे १८९७च्या सुमाराला उरुस व रामजन्मोत्सव हे दोन्ही उत्सव एकत्र साजरे करण्यास सुरुवात केली. त्याची घटना ही अशी घडली.....

श्री. गोपाळराव गुंड नावाचे बाबांचे एक परम भक्त होते. त्यांना बाबांच्या कृपेनं मुलगा झाला. हा आनंद साजरा करण्यासाठी शिरडीत दरवर्षी यात्रा अथवा उरुस भरविण्याचा त्यांच्या मनात विचार आला. त्यांनी हा विचार शिरडीतील इतर भक्त तात्या कोते, दादा कोते आणि माधवराव यांच्यासमोर ठेवला. त्यांनाही तो पसंद पडला. त्या सर्वांच्या ह्या विचाराला बाबांची अनुमती मिळाली. उरुस भरवायला सरकारची परवानगी आवश्यक होती. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्याला पत्र लिहिण्यात आलं; परंतु गावातील एका कुलकर्ण्यानं हरकत घेतल्याने सुरुवातीला परवानगी मिळाली नाही; मात्र बाबांचे आश्वासन असल्याने पुन्हा परवानगी मागण्यात आली व ती मिळाली. बाबांच्या अनुमतीनं रामनवमीच्या दिवशी उरुस भरवायचं निश्चित झालं. बाबांनी भिन्न-भिन्न धर्मांच्या लोकांना एकत्र आणण्यासाठीच रामनवमीच्या दिवशी उरुस निश्चित केला असावा, हे उघड आहे. शिरडीत दोन विहिरी होत्या. त्यातील एका विहिरीत बहुदा पाणीच नसे, तर दुसऱ्या विहिरीत खारं पाणी असे. बाबांनी खाऱ्या पाण्याच्या विहिरीत फूल टाकून ते गोड केलं. उत्सवात भरपूर पाणी मिळावं म्हणून तात्या पाटील यांनी बाहेरूनही पाणी आणण्याची योजना आखली. उत्सवात भजन, पूजन, वाजंत्री-चौघडे यांचे आयोजन करण्यात आले. ह्या समारंभात निमोणकरांचे एक व दामूअण्णांचे एक अशी दोन निशाणे मिरवली जात व शेवटी



मशिदीच्या कळसावर बांधली जात.

साईबाबांचे एक भक्त कृष्ण जागेश्वर भीष्म यांच्या मनात रामनवमीच्या दिवशी उरूस साजरा केला जातो, त्याचप्रमाणे रामजन्मोत्सवही साजरा केला, तर आनंदाला आणखीनच बहर येईल, अशी कल्पना आली. ही कल्पना त्यांनी बाबांचे एक भक्त काका महाजनी यांना बोलून दाखविली. ती त्यांना रुचली व त्यांनी बाबांचा होकार घेण्यास कृष्ण जागेश्वर भीष्म यांना सांगितले. ह्या शुभ प्रसंगी कीर्तन कोण करणार, हा प्रश्न उभा राहिला. यावरती कृष्ण जागेश्वर भीष्मांनी उपाय सुचविला. ते स्वत: कीर्तन करतील, काका महाजनी पेटीचा स्वर धरतील व राधाकृष्णामाई सुंठवडा करतील, असे ठरले. त्यानंतर काका महाजनी व भीष्म बाबांकडे अनुमती घेण्यास गेले. तेव्हा बाबांनीच काका महाजनींना प्रश्न केला, वाड्यात काय चालले होते? काका महाजनींना काय सांगावे, तेच सूचेना. त्यानंतर बाबांनी भीष्मांना विचारले, तेव्हा कुठे काका महाजनींना आठवण झाली व त्यांनी आपला विचार बाबांनाही सांगितला. त्यावर बाबांची परवानगी मागितली. बाबांनी ती लागलीच आनंदाने दिली. अशाप्रकारे शिरडीत रामनवमीच्या दिवशी उरुस व श्री रामजन्मोत्सव भिन्न-भिन्न धर्मांचे लोक एकत्र येऊन गुण्यागोविंदाने साजरे करु लागले.

**- तुमचा बालसाईभक्त सवंगडी**

---

शब्द शोध क्र. ६

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ■ | ३ | ■ |
| २ | | | ■ |
| | ■ | ४ | |
| ■ | ५ | | ■ |

**आडवे शब्द :-**

२. दैत्य, दानव

४. शबरीने रामाला जी उष्टी फळं खायला दिली, त्या फळांचं नाव

५. युद्धात शत्रुला ठार मारणे

**उभे शब्द :-**

१. फकीर, संन्यासी

३. एक धार्मिक ग्रंथ

---

चिंतन

- फकीर

# श्रद्धा

समाजात आपल्याला अनेक व्यक्ती ''धरसोड'' वृत्तीच्या दिसून येतात. थोडक्यात ते आरंभशूर असतात. एखादं विधायक काम हाती घेण्यापूर्वी कधी एकदा ते हाती घेतो, असं त्यांना होतं; परंतु मग ते विधायक काम अर्धवट सोडलं जातं. असं होण्यामागे जी काही कारणे आहेत, त्यात प्रमुख एक कारण आहे, ते म्हणजे त्या विधायक कामावर नसलेली श्रद्धा. केवळ धार्मिक बाबतीतच नव्हे, तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात श्रद्धा ही असावी लागते. परंतु ह्या श्रद्धेचा अतिरेक झाला की, तिचं रूपांतर अंधश्रद्धेत होतं. ही अंधश्रद्धा निर्माण व्हायला जसं अज्ञान कारणीभुत ठरतं, तसंच आटेकोट प्रयत्न करूनही येणारं अपयश, वारंवार कोसळणारी आपत्ती, कायमचं दारिद्र्य, आजारपण इत्यादी अनेक कारणं यामागे आहेत.

मांजर आडवं जाणं, डोळा फडफडणं, साखळी पत्र पाठवणं, देवदासी, बळी देणं आदी प्रकार हे अंधश्रद्धेचेच परिणाम आहेत. हे केवळ अज्ञानामुळेच घडतं, असं गृहीत धरलं, तर समजण्यासारखं आहे. परंतु सुशिक्षितही जेव्हा ह्या गोष्टी मानायला लागतात, तेव्हा नवलाबरोबरच चिंताही वाटते. यासाठी एक नेहमी पहावयास मिळणारं उदाहरण घेऊ. रस्त्यात जर मध्येच मांजर आडवं आलं, किंवा घरातून बाहेर पडताना कुणी शिंकलं, तर पांढरपेशा माणूसही दचकतो, थोडा थांबतो व मगच पुढे निघतो. ज्यांनी अज्ञानी लोकांना ह्या अंधश्रद्धांपासून परावृत्त करायचं, तेच जर ह्या अंधश्रद्धा मानू लागले, तर ह्या अंधश्रद्धा कायमच्या केव्हा गाडल्या जाणार? असा प्रश्न निर्माण होतो.

लोकांच्या ह्या अंधश्रद्धेचा संधीसाधू बुवाबाजी करणारे पुरेपूर फायदा उठवित असतात, लोकांना अक्षरश: लुबाडत असतात.

आता कुणी म्हणेल, आपण लहान मुलांना असं केलंस, तर पाप लागेल, तसं केलंस, तर बाप्पा नाक कापेल, असं म्हणतो, तर ही अंधश्रद्धा नव्हे काय? ही जरी अंधश्रद्धा असली, तरी तो एक संस्कारांचा, मुलांना वळण लावण्याचा एक भाग आहे, हे विसरून कसं चालेल.

ज्या खरोखरच अंधश्रद्धा आहेत, माणसाला कैक वर्षे मागे नेणाऱ्या आहेत,

ह्यांनी पोहचविणाऱ्या आहेत, मानवाची प्रगती खुंटविणाऱ्या आहेत, त्यांना समाजातून हद्दपार केलंच पाहिजे. असं करीत असताना माणसांच्या श्रद्धांना मात्र जपलं पाहिजे. कारण जीवनात श्रद्धेला एक मौलिक स्थान आहे. घरातून बाहेर पडताना देवाला, थोरामोठ्यांच्या पाया पडणं, ह्या श्रद्धा आहेत. त्यामुळे नम्रता, आदरभाव बाळगणं हे गुण जोपासले जातात. विधायक कामांच्या बाबतीत म्हणाल, तर तिथे नितांत श्रद्धा आवश्यक आहे. म्हणूनच अंधश्रद्धेचं निर्मूलन करताना श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांतील फरक जाणून घेणं जरुरीचं आहे.

---

## मोक्षाचे धाम

श्री – श्रीमंत चुडामणी, माझे साई जननी।
सा – सादर मस्तके नमती तुझे चरणी॥
ई – ईशचरणाची आस मन आले भरुनी।
ना – नातें तुझे माझे सुत माता म्हणूनी॥
थां – थांगपत्ता न लागे कृपा वात्सल्याचा।
ची – चीत शक्तिचा ठेवा मार्ग श्रद्धा सबुरीचा॥
शि – शिरडीवासी जगन्नाथा तुझा वाहो प्रेमप्रवाह।
र – रमावरा करुणाकरा पावन व्हावा देह॥
डी – डिवचती हे षड्रिपू सर्वांगाला होई दाह।
मो – मोक्षाची उघडण्या द्वारे तूच संरक्षी हा देह॥
क्षा – क्षाळण्याला पद तुझे मागतसे मी मागणे।
चे – चेतवी ज्ञानाग्नी माझा, तुझ्यासाठी व्हावे जगणे॥
धा – धावपाव साईनाथा तुझा महिमा महान रे।
म – मनी वसे रुप तुझे दिव्य आणि पावन रे॥

**– श्री. बबन डी. येरम**
घाटकोपर, मुंबई.

# गातसे गीता गोविंद

## (गीतेचे सारसर्वस्व)

प्रस्तावना

* भगवंतानी युद्धाच्या ऐन रणधुमाळीत अर्जुनाला गीता सांगितली. गीता हे कर्तव्यापासून दूर जाण्याचे तत्वज्ञान नाही कीं शिळोप्याच्या वेळचे एकांत मनोरंजन नाही. ती एक दिव्य जीवन दृष्टी आहे! जीवनाचे ते एक प्रात्यक्षिक आहे! समदृष्टीने आणि योगस्थितीमध्ये आचरावयाच्या कृतीशील जीवनाचा एक कर्मयोगी आविष्कार आहे.

* गीता म्हणजे शंकराचार्यांचा संन्यास नव्हे, ज्ञानदेवांची भक्ती नव्हे! टिळकांचा कर्मयोग नव्हे की अरविंदाचा एकात्मयोग नव्हे; तर या सर्वांचा सुंदर मनोज्ञ संगम आहे. भगवंतानी भक्तीत भिजलेले निस्वार्थ, निरपेक्ष कर्म शिकविले. हे कर्म आचरताना आवश्यक असलेली भक्तीयुक्त समर्पण भावना, ज्ञानात्मक योगावस्था अथवा समदृष्टी सांगितली. गीतेचे कर्म, भक्ती, ज्ञान व योग यांच्या दिव्यतेने किनारलेले तत्वज्ञान मानण्यात येते. गीता हे जीवनदर्शन आहे, आत्मदर्शन आहे, ती एक परिपूर्ण जीवनसारणी आहे.

* सर्व उपनिषदे, वेदांत, धर्मशास्त्रे, जीवन-निष्ठा यांचे गीता हे सार आहे. जीवनातील सत्यं, शिवं, सुंदरं तत्वाचा आविष्कार आहे. जीवाला शिव बनविण्याचे आणि शिवाला कर्मयोगी बनविण्याचे गीता हे एक सुंदर प्रात्यक्षिक आहे! शुद्ध आचारविचार, भक्ती व निष्ठा, समर्पित जीवन, भूतीं भगवंत पहाण्याची समदृष्टी व ज्ञानात्मक योगावस्था म्हणजे गीतेचे परिपूर्ण जीवन होय!

### (अध्याय १ ला)

श्रीमद्‌भगवद्‌गीतेद्‌वारा श्रीकृष्णांनी, वेदांताचे हृद्‌गत आणि उपनिषदांचे सार, जगाला सांगितले. कौरव-पांडव युद्धाच्या ऐन प्रारंभी श्रीकृष्णांनी धनंजयाचा रथ दोन्ही सैन्यामधोमध समरांगणावर उभा केला. युद्धासाठी आतुर होऊन गर्जणाऱ्या आप्तस्वकियांना पाहून अर्जुन विषण्ण झाला. ''कुळाचा, धर्माचा आणि आचारांचा नाश करून मला पृथ्वीचेच काय पण स्वर्गाचेहि साम्राज्य नको'' असे त्याने श्रीकृष्णांना सांगितले. त्याच्या हातातून धनुष्य गळले. घशाला कोरड पडली, अर्जुन युद्ध विन्मुख झाला, कर्तव्याला विसरला.



## (अध्याय २ रा)

श्रीकृष्णांनी एक स्मितहास्य केले. ते म्हणाले, 'अर्जुना, ऐन रणभुमाळीत ही भीरुता तुला कुठली सुचली? अरे, कुणी कुणाला मारीत नसतो. हे प्रपंचाचे स्वरूप अनित्य, मायावी, क्षणजीवी आहे. परंतु आत्मा अविनाशी आहे. अरे तूं, मी व हे राजे पूर्वीही होतो व पुढेहि असणार. या चैतन्याला नष्ट करता येत नाही. हे जळत नाही, भिजत नाही, तुटत नाही की विनाश पावत नाही. जगामागचे शाश्वत तत्व पाहून अशाश्वतासाठी रडू नकोस. मी तुला सांख्यांच्या या तत्वज्ञाना बरोबर बुद्धियोगहि शिकवितो. अरे, तू स्थितप्रज्ञ हो. बुद्धि स्थिर करून योगयुक्त कर्म कर. सुख दुःख, शोक मोह यांच्या पलीकडे जा. कर्तव्यबुद्धीने फलाशा सोडून कर्म कर. समुद्राला नद्या मिळाव्यात, तसे सारे विषय तुझ्या मनःशांतीला न ढळविता तुझ्यामध्ये विलीन होऊ देत. ही योगस्थिती, अविचल शांति आणि कर्ममुक्ती यांचा तू धनी हो!

## (अध्याय ३ रा)

अर्जुनाने श्रीकृष्णांना विचारले 'भगवंता, कर्माहून बुद्धी श्रेष्ठ असे तू म्हणतोस. तर मग या युद्धाच्या खाईत मला का लोटीत आहेस?

कृष्णांनी म्हटले: ''अर्जुना, या जगात संन्यास व कर्मयोग हे दोन मार्ग आहेत. संन्यासात नुसती कर्मे आवरून मनाचा संयम होत नाही. मन विषयांत रमतेच. त्यापेक्षा कर्मे अनासक्तपणे करणे चांगले. ईश्वराला अर्पण केलेले अनासक्त कर्म म्हणजे एक यज्ञ आहे. असे कर्म बंधनात टाकीत नाही. कर्तव्यकर्मे प्रत्येकाला करावीच लागतात. कर्मांवाचून पोटहि भरणार नाही. मी मुक्त असूनहि लोकसंग्रहासाठी, लोकांच्या मार्गदर्शनासाठी कर्मे करतो. प्रकृती आपल्या गुणानुसार कर्मे घडविणारच. आपण अनासक्तपणे कर्तव्ये पार पाडावी. अरे इंद्रियाहून मन श्रेष्ठ, मनाहून बुद्धी श्रेष्ठ, बुद्धीहून आत्मा श्रेष्ठ. इंद्रियांच्या ईषणांचा त्याग करून 'यज्ञ' स्वरूपाची कर्मे करणे, हा निष्काम कर्ममार्गच श्रेयस्कर आहे.''

## (अध्याय ४, ५ व ६)

श्रीकृष्ण म्हणाले, ''मी तुला कर्म मार्ग श्रेयस्कर असल्याचे सांगितले. तरीहि कर्म हे ज्ञानरूप यज्ञातील एक आहुती आहे हे लक्षात ठेव. सर्व कर्मांचा शेवट ज्ञानात व्हायास हवा. कारण ज्ञानाहून काहीहि श्रेष्ठ नाही. जीवन हा एक आत्मज्ञानाचा भाग असल्याने निष्काम कर्म हे आत्मलाभाचे एक साधन ठरते. म्हणूनच कर्मे ईश्वरार्पण करताना ज्ञानबुद्धी जागृत हवी. याच ज्ञानदृष्टीला समदृष्टी म्हणतात. ज्ञानी हा अनित्य अशा व इंद्रियभोगांचा स्वीकार करुनहि त्यात लिप्त नसतो. तो भ्रूमध्यावर दृष्टी स्थिर

करतो. प्राण अपान सम करतो व मनबुद्धी आवरून आत्म्यामध्ये एकाग्र रहातो. ही ज्ञानदृष्टी निर्माण व्हावयास ध्यानाचा अभ्यास हवा. शुद्ध एकांत स्थानी नासिकाग्र दृष्टीने बसून माझ्या स्वरूपाशी एकाग्र होणारा योगी माझ्याकडे येतो. संकल्प विकल्प, सुख दुःख यासारखी द्वंद्वे यांच्या पार जातो. योग्य आहारा-विहाराद्वारे चित्तशुद्धी पावतो व माझ्यामध्ये स्थिर होतो. अस्थिर मनहि संयमाने स्थिरावते. दुर्दैवाने योगसाधना अपूर्ण राहिली, तरी ती वाया जात नाही. पुन्हा पवित्र वंशात जन्मून योगी साधना पुरी करुन मलाच येऊन मिळतो.

## (अध्याय ७, ८ व ९)

श्रीकृष्ण म्हणाले : 'अर्जुना, मी तुला कर्मयोग, ज्ञानयोग व योगस्थिती याबद्दल सांगितले. योगाच्या अभ्यासातून ज्ञानदृष्टी उमलते. कर्माचे ज्ञानयज्ञात हवन करताना ही ज्ञानदृष्टी असावी लागते. परंतु ज्ञान, कर्म व योग हे तिन्ही मार्ग जेथे एकवटतात, सोपे बनतात, त्या माझ्या भक्तीचे मर्म मी तुला सांगतो. भक्ति ज्ञान आहे, योग आहे आणि कर्मयज्ञहि आहे. मी सर्व भूतांचा महेश्वर आहे; हे जग वासुदेवात्मक आहे; मी प्रकृतीचा निर्माता, प्रेरक व स्वामी आहे; ही माझ्या भक्तीतली ज्ञानाची बैठक आहे. मी कर्माच्या यज्ञाचा होता, हवी व हवन आहे; उपभोक्ता आहे; ही माझ्या कर्मसमर्पण भक्तीमागील भूमिका आहे. सारी देहद्वारे बंद करून, मनप्राण एकरूप करून माझ्या रूपाचे चिंतन स्मरण करणे, हा माझ्या भक्तीतील अभ्यास योग आहे. म्हणून तू माझ्या भक्तीत साऱ्या मार्गांचे सारसर्वस्व मिळव. माझ्यावर चित्त लाव, मला कर्मे अर्पण कर. माझे परमात्मरूप जाण. माझे नामसंकीर्तन, लीलागायन अनन्यभावे कर. मी तुला सांभाळीन. संसार सागराच्या पैलपार नेईन. मला पत्र, पुष्प काहीहि चालते. माझा भक्त नष्ट होत नाही. मी भक्तांचा प्रपंचभार स्कंधावर वाहतो. त्याचा योगक्षेम वाहतो.

## (अध्याय १० व ११)

श्रीकृष्ण : ''अर्जुना, माझ्या भक्तीत सारे मार्ग एकवटले आहेत. मी सर्व लोकमहेश्वर, सर्वशक्तिमान असूनही माझे खरे स्वरूप फारच थोडे जाणतात. माझ्या दिव्य विभूतीनी जग व्यापले आहे. सूर्य, चंद्र, इंद्र, यक्ष, राक्षस, जीवसृष्टी, वृक्षलता, पर्वत, जलचर या सर्वात मी भरलो आहे. मी ज्ञान, नीति, सत्वगुण, ऐश्वर्य, प्रभा, सौंदर्य आहे. मी तुला दिव्यदृष्टी देतो. तू माझे विश्वरूप पहा!

अर्जुन : भगवंता, तू अनेक बाहूंचा, मुखांचा, रूपांचा आहेस. तू पृथ्वी आकाश ग्रहगोल व्यापून आहेस, व्यक्त अव्यक्ता पलीकडील दिव्य तत्व तू आहेस. तू निर्माता, पालनकर्ता व संहर्ता आहेस.

## (अध्याय १२)

श्रीकृष्ण म्हणाले: ''अर्जुना! माझे दिव्य विराट रूप पाहिलेस ना? माझी शक्ती, सामर्थ्य आणि विभूतिमत्व जाणून तू मला शरण ये. माझ्या भक्तीने मत्परायण हो. माझी सगुण भक्ति सोपी आहे. माझ्यात चित्त बुडव. मन मजकडे लाव. सुख-दुःखाच्या, हर्षामर्षाच्या पार जा. तुला ज्ञान, ध्यान, अभ्यास-योग जरी जमला नाही, तरी तू मला कर्मे अर्पण करीत जा. निदान कर्मांच्या फळांचा त्याग कर. त्याने तुला शांति मिळेल.

## (अध्याय १३, १४ व १५)

श्रीकृष्णानी ज्ञान, कर्म, योग आणि भक्ति यांचे परस्परसंबंध पहिल्या ९ अध्यायात अर्जुनाला शिकविले. १० व ११ व्या अध्यायात स्वतःच्या विभूति सांगून विश्वविराट स्वरूप दाखविले. १२ व्या अध्यायात यात सर्व मार्गांचा समन्वय केला. त्यानंतर भगवान अर्जुनाला म्हणाले–

''माझे दिव्यरूप पाहिलेस. आता तू मत्परायण हो. मला भज. माझ्या मायेचे लीला क्षेत्र म्हणजे हा देह आहे! मी क्षेत्रज्ञ परमात्मा आहे. त्रिगुणात्मक मायेच्या क्षेत्राला ओलांडून मला क्षेत्रज्ञाला तू जाण. मी तुला माझी माया पार करावयाची शक्ति देईन. माझी भक्ति, समर्पित कर्म व ज्ञानदृष्टी या द्वारे तू माझी माया तर. संसार हा उलटा वृक्ष आहे.... वर मूळ, तर खाली त्रिगुणांच्या पंचभूतांच्या फांद्यांचे गुंतागुंतीचे जाळे! त्या वृक्षाला तू माझ्या कृपेतून मिळणाऱ्या ज्ञानाच्या शस्त्राने छेदून स्वतः ''पुरुषोत्तम'' हो!

## (अध्याय १६, १७ व १८)

गीतेचा समारोप करताना श्रीकृष्णानी अर्जुनाला आचरणाचे महत्व सांगितले. कर्म व आचार हे आत्मज्ञानापूर्वी जसे अटळ आहेत, तसेच ते ज्ञानानंतरहि माणसाला टाळता येत नाहीत. म्हणून आचाराचा विवेक हवा. सदाचार आणि सत्कर्मे यामुळे देह व मन शुद्ध होते. या दोघांच्या शुद्धीशिवाय खरी भक्ती, खरा योग वा खरे ज्ञान अशक्यच आहे. म्हणून कर्मे व आचार दैवी सद्गुणातून स्फुरले पाहिजेत. दाने, तप, आचार, श्रद्धा, आहारविहार, सुख-दुःखे तीन प्रकारची असतात. तामस, राजस व सात्विक! प्रेम, दया, करुणा, शांती-निस्वार्थ सेवा इत्यादी प्रेरणातून सात्विक कर्म स्फुरते. शरीर, इंद्रिये, जीवन, क्रिया व दैव या कर्मांच्या पांच प्रेरणा आहेत. परमेश्वरशक्ति, आत्मयोग, ईशसमर्पणवृत्ति यामुळे या प्रेरणा शुद्ध होऊन बंधनकारक व मोक्षकारक कर्मांचा विवेक करता येतो. सदाचरण, नीति, त्याग, सेवा व भक्तीत

भिजलेले कर्म भगवंताकडे नेते. शेवटी श्रीकृष्ण म्हणाले. ''अर्जुना मला शरण ये, माझ्यावर विश्वास ठेव, मला भज, मी सांगतो तसे कर. मी तुला कर्माकर्मातून मुक्त करीन. शंका व संदेह सोड आणि कर्तव्यबुद्धीने युद्धाचे क्षात्रकर्म आचर!'' संमोहातून जागृत झालेल्या अर्जुनाने पुन्हा शस्त्र धारण केले व तो भगवत्प्रेरणेने युद्धाला सज्ज झाला.

## समारोप

गीतेने कोणती शिकवण दिली आहे, हे मोजक्या पण समर्पक शब्दात सांगायचे म्हणजे भगवंतानी मानवाला किमान फलाशारहित निःस्वार्थ कर्मे करण्यास सांगितले आहे. त्यामुळे मानवी मनाला किमानपक्षी शांति मिळेल याचा अर्थ निःस्वार्थसेवा व मानवताधर्म ही गीतेची शिकवण आहे. एवढे घडले तरी मानवी जीवनाचे सार्थक होईल हीच संतधर्माची मुख्य शिकवण आहे. श्री साईबाबांनी हेच सांगितले आहे.

या फलाशारहित निष्काम कर्मांना अनन्यभक्ति, सर्वस्वसमर्पण व शरणागती यांची जोड दिल्यास भगवंत भक्ताची सर्वच जबाबदारी स्वतःवर घेतात. जन्म-मृत्यूच्या चक्रातून अशा अनन्य व समर्पणभावाच्या भक्तास उद्धारण्याचे प्रगट आश्वासन गीतेत भगवंतानी स्पष्टपणे दिले आहे.

यापुढील पायरी ज्ञानी योगी भक्तांची. आपण निष्काम व अनन्यभक्त असाल व ज्ञानाची समदृष्टी व योगावस्था याद्वारे मनप्राण कधी अहंकाराच्या सीमा ओलांडून परमात्म्याच्या वैश्विक जाणीवेशी स्वतःची आत्मबुद्धी व व्यक्तिगत जाणीव यांचा सुसंवाद साधीत असाल, तर तुम्ही साक्षात भगवंताचे रुपडे बनाल.

- चकोर आजगांवकर

# श्री साईंचे सत्य चरित्र - अध्याय ५ वा

सटीक गद्य अनुवाद:
ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
बंड गार्डन रोड, पुणे.

(मागील अंकावरुन पुढे चालू)

तसेच गंगागीर नावाचे एक पुणतांब्याचे (दौंड-मनमाड रेल्वेमार्गावरील एक गाव) गृहस्थाश्रमी, थोर वैष्णव (विष्णुभक्ती संप्रदायाचे अनुयायी) यांचे वरचेवर शिरडीत येणे (आगमन) होत असे. सुरुवातीला दोन्ही हातात मातीच्या घागरी घेऊन विहिरीवरून साईबाबांना पाणी वाहताना पाहून या गंगागीरांना मोठे आश्चर्य वाटे. परंतु पुढे साईबाबांशी अशी समोरासमोर भेट (दृष्टादृष्ट) होताच, ते (बुवा) अगदी स्पष्टपणे (असंदिग्ध शब्दात) म्हणाले, "धन्य शिरडीचे भाग्य की असले श्रेष्ठ रत्न तिने मिळविले (जोडले). आज हा खांद्यावर पाणी वाहतो परंतु ही मूर्ती सामान्य नाही. या भूमीचे (जागेचे) काही पुण्य होते म्हणूनच ही (मूर्ती) येथे येऊन पोहोचली ( पातली). (ओ. ३६-३९)

तसेच आणिक आनंदनाथ नावाने विख्यात असलेल्या एका संताचेही 'हे अद्‌भुत कर्तृत्व (अपूर्व कार्य) करतील', असेच भाकित (भविष्य सांगणे) होते. या महाप्रसिद्ध आनंदनाथांचा येवले गावी (कोपरगाव-मनमाड रेल्वेमार्गावरील गाव) मठ (आश्रम) होता. ते काही शिरडीकरांबरोबर एकदा शिरडीस आले (माधवराव देशपांडे, नंदराम मारवाडी वगैरे शिरडीत राहणारे गावकरी त्यांच्या दर्शनाला येवल्याला गेले असताना त्यांच्याबरोबर बैलगाडीतून आनंदनाथ शिरडीस आले). अक्कलकोट महापुरुष (स्वामी समर्थ) यांचे आनंदनाथ शिष्य होते. साईबाबांना समक्ष पाहून ते म्हणाले, "अहो! हा प्रत्यक्ष हिरा आहे हिरा. आज जरी हा उकिरड्यावर पडला आहे, तरी हा हिरा म्हणजे गारगोटी (गार=कठिण पांढरा दगड) नव्हे." आनंदनाथांचे हे उद्‌गार (तोंडातून निघालेले शब्द) निघाले, तेव्हा बाबांचे पोरवय होते. आनंदनाथ आणखी म्हणाले, "माझे हे बोल ध्यानात ठेवा. पुढे तुम्हाला आठवण येईल." असे पुढचे भविष्य सांगून मग आनंदनाथ येवल्यास परत गेले. (ओ. ४०-४४)

हे साई तरुणवयात डोक्याचे केस सबंध राखीत असत, डोके कधीच मुंडावीत नसत (डोक्याची कधीच हजामत करवीत नसत) व (एखाद्या) पहिलवानासारखा पेहराव (पोशाख) करीत असत. बाबा जेव्हा रहाल्याला जात, तेव्हा झेंडू, जाई, जुई (वगैरेंची रोपे) आणीत व आपल्या हातांनी उजाड जागेत लावीत (उखरी खुपसीत) आणि नियमितपणे पाणीही घालीत असत. त्यांचे भक्त वामनतात्या त्यासाठी

(तत्प्रीत्यर्थ) मातीचे (मृत्तिकेचे) कच्चे दोन घडे दररोज (प्रत्यही) पुरवीत आणि बाबा आपल्या हातांनी पाणी शिंपीत असत. विहिरीवरील (आडावरील) कुंडीमधून पाणी खांद्यावर (घड्यात) वाहून आणीत आणि संध्याकाळ (अस्तमान) होता, ते (घडे) निंबाच्या झाडाच्याखाली नेऊन ठेवीत असत. तेथे ठेवण्याचाच अवकाश, की ते (घडे) जागच्याजागीच फुटून (भंगून) जात आणि वामनतात्या दुसऱ्या दिवशी प्रात:काळी (उदयीक) बाबांना नवे (नूतन) घडे आणून देत असत. (खरे म्हणजे) भाजलेला घडा टिकाऊ आणि चांगला परंतु बाबांना कच्चा, कोरा कुंभाराच्या भट्टीत घालण्याच्या श्रमाशिवायचा (आव्याचे श्रमावीण) घडा लागे. घड्याचा विकरा (विकण्याची क्रिया) ते आधीच घडवून आणीत. तीन वर्षे हाच उद्योग करून बाबांनी उघड्या जागेत बगीचा उठविला आणि त्याच जागी आज हा सुयोग येऊन (साठ्यांच्या) वाड्याचा उपभोग लोक घेत आहेत. (ओ. ४५-५१)

येथेच निंबवृक्षाखाली एका भाई नावाच्या भक्ताने पूजा करण्याची इच्छा असणाऱ्या साधकांकरिता अक्कलकोटच्या स्वामींच्या पादुका स्थापल्या. भाईंचे उपास्य (आराध्य) दैवत अक्कलकोटचे स्वामी समर्थ होते व ते त्यांच्या छबीचे पूजन निष्ठेने व नित्यनेमाने करीत असत. (एकदा) त्यांना वाटले की, (आपण) अक्कलकोटी जावे, पादुकांचे दर्शन घ्यावे व मनोभावाने पूजा, उपचार समर्पावेत. मुंबईहून निघावयाची सर्व तयारी केली. उद्या निघणार, तो (त्यांचा) बेत (निश्चय) तसाच राहून गेला आणि (त्यांनी) शिरडीची वाट धरली. उद्या जाणार, तो आज स्वप्नात स्वामी समर्थांची आज्ञा झाली की, सध्या (सांप्रत) माझा निवास शिरडीत आहे, तर तू तेथे जा (प्रस्थान करीं गा). अशी ती आज्ञा शिरी वंदून मुंबईहून भाई निघाले व शिरडीत सहा महिने (षण्मास) राहून आनंदसंपन्न झाले. भाई अत्यंत निष्ठावंत होते. त्या दृष्टांताची आठवण राहावी म्हणून तेथे निंबवृक्षाखाली त्यांनी स्वामींच्या पादुका स्थापिल्या. शके १८३४ (सन १९१२) साली श्रावणातील शुद्ध पक्षाच्या पुण्यकाळी (पर्वकाळी) भजन-पूजनासह प्रेमपूर्वक निंबातळी त्या पादुका स्थापिल्या. चांगला मुहूर्त पाहून दादा केळकरांच्या (कै. गणेश दामोदर केळकर-रावबहादूर साठ्यांचे सासरे) हस्ते पादुकांची स्थापना करविली. (मग) उपासनींनी (कै. काशीनाथ गोविंद उपासनी–पुढे साकोरीचे उपासनी महाराज) स्वत: सर्व शास्त्रोक्त विधिविधान केले. पुढील व्यवस्था (भाईंनी) याप्रमाणे सोपविली (निरवण). दीक्षित नावाच्या ब्राह्मणाने (कै. गोविंद कमलाकर दीक्षित) पूजा करावयाची आणि सगुण नावाच्या भक्ताने (कै. सगुण मेरू नाईक–हे शिरडीत भक्तांसाठी खाणावळ चालवीत असत) इतर व्यवस्था पहावयाची. असे हे पादुकांचे आख्यान (कहाणी) आहे. (श्री साईलीला–मासिक, वर्ष ११, अंक १, पृ. २५ यात या पादुकांविषयीची सविस्तर हकिकत दिलेली आहे. ती पुन्हा श्री

साईलीला – जुलै १९८१च्या अंकातील 'श्री साईबाबांचे गुरुस्थान' या लेखातही पृष्ठ २०-२१ वर अंतर्भूत केलेली आहे. वर हेमाडपंतांनी ओवी क्रमांक ५२ व ५८ मध्ये या पादुका अक्कलकोटच्या स्वामी समर्थांच्या आहेत, असे स्पष्ट म्हटले आहे; तर श्री साईलीलेच्या हकिकतीत त्या साईबाबांच्या आहेत, असे म्हटले आहे. असो.) (ओ. ५२-६१)

प्रत्यक्ष ईश्वराचे अवतार असलेले हे संत स्वतः निर्विकार (पदार्थांच्या रूपान्तराशिवायचे म्हणजे पुनर्जन्माशिवायचे) असून असेच जगताचा उद्धार व कल्याण करण्यासाठी (पृथ्वीवर पुन्हा) जन्म घेतात. असो. पुढे काही दिवस गेल्यावर एक आश्चर्यकारक गोष्ट घडली. ती श्रोत्यांनी ऐकली, म्हणजे त्यांच्या मनाला नवल वाटेल. मोहिद्दीन नावाच्या एका तांबोळी (खाण्याची पाने विकणारा) बरोबर साईबाबांचा काही वेबनाव होऊन (तेढ पडून) त्यांची कुस्ती (झोंबी) जुंपली व एकमेकांची लढाई लागली. दोघेही पटाईत पैहलवान. परंतु नशीबापुढे (होणारापुढे) जोर चालत नाही. मोहिद्दीन बलाढ्य (प्रबळ) होऊन सामर्थ्य कमी झालेले (हतबल) बाबा हरले गेले. तेव्हापासून मग निश्चय करून बाबांनी आपला सर्व पोशाखच बदलला. अंगावर कफनी (पायघोळ झगा) ओढली, लंगोट लावला आणि डोक्याला फडका गुंडाळला. गोणपाटाचे (तरटाचे) बसण्यासाठी आसन केले, त्याचेच (झोपण्यासाठी) अंथरूण केले आणि फाटके तुटके नेसून (करोनि परिधान) त्यातच समाधान मानू लागले. ते सदा (अक्षयी) म्हणत, "गरिबी म्हणजेच खरी बादशाही (राजेपणा) आहे. श्रीमंतीपेक्षा (अमीरीस) लाखपटीने ती श्रेष्ठ (सवाई) आहे. गरीबांचा अल्ला (परमेश्वर) भाई (मित्र) असतो." (ह. भ. प. दासगणू महाराजांनी त्यांच्या भक्तिसारामृताच्या अध्याय २६, ओ. २००-२०१ मध्ये म्हटले आहे की, बाबांचे गुरु शेलूचे गोपाळराव देशमुख यांनी त्यांना पश्चिमेस गोदावरीच्या दक्षिणतीराकडे, म्हणजे शिरडीकडे जाण्याची आज्ञा केली होती आणि आपल्या डोक्याचे फडके सोडून बाबांच्या डोक्यास बांधून म्हणाले होते, "या फडक्याने मी आपले सर्वस्व तुला दिले आहे." हे कितपत विश्वसनीय आहे कोणास ठाऊक? परंतु बाबांनी कुस्तीत मार खाल्ला म्हणून त्यांनी पोशाख बदलला, "अंगावर कफनी ओढली" व "डोक्याला फडका गुंडाळला," हे पटत नाही. चांद पाटलाला बाबा प्रथम भेटले, तेव्हा व नंतर वऱ्हाडाबरोबर शिरडीत आल्यावर म्हाळसापतीने त्यांना प्रथम पाहिले, तेव्हा बाबांचा वेष मुसलमानी फकिरासारखाच (अंगात कफनी व डोक्याला फडके किंवा टोपी) होता, असे त्या गोष्टींच्या वर्णनांवरून समजते. तसेच बाबांचे "अल्ला मालिक" सतत म्हणणे किंवा मशिदीत राहणे, हे काय कुस्तीत हरल्यामुळे, पोशाखात बदल झाल्यामुळे असेल? ते तर मूळचेच शिरडीत येण्यापूर्वीचेच असले पाहिजे. असो.) गंगागीरांचीही अशीच स्थिती होती. त्यांना

तालिमबाजीची (पहेलवानीची) फार आवड होती. एकदा कुस्ती खेळत असताना त्यांना वैराग्य झाले (उपरती झाली). योग्य वेळेची घटका आली आणि एका सिद्ध पुरुषाची वाणी बोलली, "देवाबरोबरच खेळ (केली) करून शरीर (तनू) झिजविले पाहिजे." कुस्ती खेळता खेळता गंगागीरांच्या कानावर हे अनुग्रहरूप शब्द पडले आणि संसारावर पाणी सोडून ते परमार्थभजनाला लागले. पुणतांब्याच्या जवळ (निकटी) गोदावरी नदीच्या दोन प्रवाहामधील बेटावर बुवांचा मठ (आश्रम) आहे आणि सेवेसाठी शिष्यही आहेत. (ओ. ६२-७२)

असो. पुढे साईनाथ (फक्त) विचारल्याचेच उत्तर देत व स्वत: आपण कोणाबरोबर कधीही बोलत नसत. दिवसा त्यांची बैठक कधी निंबाखाली असे, तर कधी गावाच्या सीमेवरच्या (शिवेच्या) ओढ्याजवळील बाभुळीच्या आडव्या फांदीच्या (डहाळी) सावलीत ते बसत असत. कधी तेथून (ओढ्यापासून) एक मैलावरील (दीड किलोमीटरवरील) निमगावाच्या परिसरात दुपारी-तिपारी मनास येईल तसे ते हिंडत असत. (या) निमगावाची जहागिरदारी प्रसिद्ध त्रिंबक डेंगळ्यांच्या घराण्याकडे होती. त्यातील बाबासाहेब डेंगळ्यांवर बाबांचे भारी प्रेम होते. निमगावाच्या फेरीवर गेले की, बाबा त्यांच्या घरी जात आणि दिवसभर अति प्रेमाने त्यांच्याबरोबर बोलत बसत. त्यांना नानासाहेब नावाचा (नामाभिधान) एक लहान भाऊ होता. त्याला मूलबाळ नव्हते ; म्हणून तो मनाने दु:खी होता. पहिल्या बायकोस (संततीचा) योग लवकर येईना (मंद), म्हणून दुसरे लग्न (द्वितीय संबंध) केले ; पण तरीही ऋणानुबंध (चालू सुखदु:खांचा पूर्वजन्मांशी ऋणसंबंध-प्राक्तन योग) चुकेना. (खरोखरच) नशीबाचे नियम समजण्यास कठीण (अगाध) असतात. पुढे बाबासाहेबांनी नानासाहेबांना साईबाबांच्या दर्शनाला पाठविले आणि त्यांना आशीर्वाद लाभून पुत्रप्रसाद प्राप्त झाला. (त्यामुळे) नंतर साईबाबांचा महिमा वाढत जाऊन त्यांच्या दर्शनाला जनसमुदाय लोटू लागला. ही बातमी (वार्ता) (जिल्ह्याच्या ठिकाणी) अहमदनगरला जाऊन पोहोचली. तेथे सरकारदरबारी नानासाहेबांचे बरेच येणेजाणे (चलनवलण) होते. तेथे जिल्ह्याच्या कचेरीत चिदंबर केशव गाडगीळ नावाचे चिटणीस होते. त्यांना नानासाहेबांनी पत्र धाडले की, साईसमर्थांचे दर्शन घेण्यासारखे (दर्शनपात्र) आहे. तुम्ही आपली मुलेबाळे व इष्टमित्र घेऊन दर्शनाला यावे. असे एकामागून एक अनेक (भक्त) शिरडीस येऊ लागले आणि जसजसा बाबांचा लौकिक वाढत गेला, तसतसा त्यांच्या दर्शनाचा परिवारही (लवाजमाही) वाढत गेला. (ओ. ७३-८४)

साईबाबांना जरी कोणाची सोबत (संगत) लागत नव्हती, तरी दिवसा ते भक्तमंडळींनी वेढलेले (भक्तपरिवाराक्रांत) असत आणि सूर्यास्त झाल्यावर


(अस्तमानानंतर) शिरडी गावातील पडक्या मशिदीत ते निजत असत. त्यांच्या अंगात पायघोळ कफनी व डोक्याला एक पांढरा (धवल) फडका असे आणि जवळ सदासर्वदा चिलीम, तंबाखू, टमरेल (tumbler-पिण्याचे भांडे) व सटका (हाताच्या अंगठ्याएवढा जाड व सुमारे दीड हात लांब दंडा) असे. ते धुवून स्वच्छ केलेले (धूत) पांढरे वस्त्र डाव्या कानामागे (वामकर्णामागे) जटाजूटप्रमाणे (गोसावी इ.कांच्या डोक्यावरील पेड वाळलेल्या केसांचा झुबका) गुंडाळीत असत. असे हे त्यांचे कपड्यांचे (शरीर) झाकणे (वसनाचे आच्छादन) असे. आठ आठ दिवस त्यांची आंघोळ (स्नान) नसे, पायात जोडा किंवा चप्पल (वहाण) नसे आणि (बसायला फक्त) तरटाचे (गोणाचे) आसन असे. पोत्याच्या (त्या) एका तुकड्यावरच त्यांची नित्य बैठक असे. (टेकायला) तक्या कसा तो त्यांना ठाऊक नव्हता. त्यांना समाधान (आराणुक) कशानेही मिळत असे. हे जुने (जीर्ण) तरटच त्यांची आवडती बैठक होती व त्याठिकाणी ते निश्चयपूर्वक (निष्टंक) सदासर्वदा (अखंड) दिवसभर बसलेले असत. (अशाप्रकारे) बसायला किंवा अंथरायला तेच तरट आणि कमरेला नेसायला (परिधान) फक्त एक लंगोटी (कौपीन) होती. दुसरे वस्त्र पांघरणे (आवरण) नव्हते. थंडीपासून रक्षण करण्यासाठी (शीतनिवारण) फक्त एक धुनीच (धूर निघणारा विस्तव) तेवढी होती. गोण्याच्या (तरटाच्या) आसनावर बसलेले (आसनस्थ) बाबा दक्षिण दिशेकडे तोंड करून (अभिमुख), डावा हात (वाम हस्त) कठड्यावर ठेवून समोर धुनीकडे पाहत (अवलोकीत) मशिदीत बसलेले असत. जणूकाय अहंकार व वासनांसहित नानाप्रकारच्या मनोव्यापारांची (राग-द्वेष, सुख-दुःख, भय-भीती) आहुती (देवतांना उद्देशून अग्नीत टाकावयाचे द्रव्य) तसेच सकळ प्रपंच प्रवृत्तीचे (संसारात आसक्त राहण्याच्या वृत्तीचे) हवन (आहुती) धुनीमध्ये नानाप्रकारच्या युक्त्यांनी (युक्तिप्रयुक्तीने) ते करीत असत. अशा त्या अतिशय उष्ण (प्रखर) कुंडाला (पवित्र अग्नी ठेवण्याचे पात्र) (बाबांनी) ज्ञानाच्या अभिमानाचा ओंडा (लाकडाचा ठोकळा) लावला (ज्ञानाचा अभिमान जाळून टाकला). त्यांच्या तोंडी सदैव 'अल्ला-मालिक' (परमेश्वर सर्वाधिपती आहे) असे व ते सदा त्याचा (अल्लाचा) झेंडा मिरवीत असत (गुणगान गात असत). मशीद तरी ती केवढी? दोन खण (दोन खांबांमधील किंवा दोन तुळ्यांमधील अंतर) ती जागा. त्यातच बाबा बसत, उठत आणि सर्वांना भेटही देत असत. गादी तक्या तो आता आला आणि भोवती भक्तसमुदायही गोळा झाला. सुरुवातीला त्यांच्याजवळ (निकट) जाण्याला सगळ्यांना सुरक्षितता (निर्भयता) नव्हती (भीती वाटत असे). सन १९१२ पासून हा सारा नवा प्रकार सुरु झाला व मशिदीच्या अवस्थेतही खरा बदल होण्याला सुरुवात झाली. मशिदीच्या जमिनीत गुडघ्याएवढे (ढोपर ढोपर) खड्डे होते. तेथे भक्तांच्या भावापायी एका रात्रीत (निशीत) फरसी (दगडी

च्चिपांनी केलेली जमीन) झाली. मशिदीत राहण्यास येण्याआधी बाबा तकियात (फकिरांचे विश्रांतिस्थान) राहत असत व तेथेच बऱ्याच काळापर्यंत ते रमले होते. तेथेच पायात घुंगरू (घुंगुर) बांधून खंजिरीच्या (लहान डफडी किंवा टिमकी) तालावर बाबा अति सुंदर नाचत असत व प्रेमाने गोड (मधुर) गातही असत. (ओ. ८५-१००)

# ही अंधश्रद्धा संपवा - सांखळी पत्रे थांबवा

१९८९ च्या जून महिन्याच्या "श्री साईलीले"त "विपर्यस्त भक्ती" या शीर्षकाखाली या विषयावर एका साईभक्ताचे आवाहन छापलेले आहे. तथापि, साखळीपत्रांची अर्थशून्य वेडी तोडण्यात भक्तांची अद्याप प्रगती झालेली नाही. अनेक बुद्धीनिष्ठ साईभक्तांची याबाबत मार्गदर्शन करण्याची "श्री साईलीले"ला पत्रे येत आहेत. ही एक गंभीर समस्या झालेली आहे.

श्री बाबा हे व्यवहार्य मार्गांनी अडचणी सोडविण्यास उत्तेजन देत. मात्र श्रद्धा-सबुरी व भगवंताचे अधिष्ठान हवे. श्री साईबाबांनी कधी अंधश्रद्धेला वाव दिला नाही. बाबा सत्याचे द्रष्टे होते. साखळी-पत्रे लिहिली, तर लक्षावधी रुपये ते बक्षीस देणारे नाहीत की, ही शृंखला तोडली, तर शिक्षाही करणारे नाहीत. चुकीची श्रद्धा व अकारण भय यांवर ही पत्रांची साखळी उदयाला आली आहे. ही अंधश्रद्धा व भयभीती तोडली पाहिजे. श्री बाबा साखळी-पत्रे लिहून प्रसन्न होत नाहीत. ते नामस्मरण, रुपध्यान यांसारख्या प्रेममय उत्कट साधनेने प्रसन्न होतात. त्यांच्या नामाची साखळी (अखंड स्मरण) चालू ठेवा. ते कृपा करतील. त्यांच्या रूपात स्वतःचे विसर्जन करा. तुम्ही गुरुरूप व्हाल. तीस पत्रे लिहून तुम्हाला संपत्ती मिळणार नाही. पत्रे लिहिली नाही, तरी करुणामूर्ती बाबा तुम्हाला शासन करणार नाहीत. साखळी-पत्रांच्या स्वस्त, विपर्यस्त व तर्कविसंगत अंधश्रद्धेचे गोदावरीच्या पाण्यात विसर्जन करा. खऱ्या प्रेम भक्तीत बुडा. हे आपल्याला "श्री साईलीले"चे आवाहन आहे. साखळी-पत्रे लिहून अंधश्रद्धेची जोपासना न करण्यातच खरी श्रद्धा व भक्ती आहे.



साधनेच्या विश्वात

- चकोर आजगांवकर

# दिव्य जीवनाकडे - १०

मागील लेखांत नाथ व दत्तपंथाचे विचार थोडक्यात मांडले, त्यांचा विस्तार आता दत्तमहात्म्य, त्रिपुरा रहस्य व दत्ताच्या उपदेशाच्या आधारे करीत आहे. श्री दत्त हे योगेश्वर, भक्तांचे परमेश्वर व ज्ञान्यांचे ज्ञानेश्वर असल्याने हे चिंतन अत्यंत मौलिक ठरेल, यात शंका नाही.

**दत्तरूप संत वासुदेवानंद सरस्वती :** 'दत्तमहात्म्य' या दिव्य ग्रंथात त्यांनी कर्मफल व अहंकार त्याग करून शास्त्रशुद्ध कर्म करावयास सांगितले आहे. स्थूल, सूक्ष्म व कारण देहात मनबुद्धी, इंद्रिये सूक्ष्मरुपाने असतात ; त्यामुळे ती कर्मशुद्धीने शुद्ध हवीत. मन भक्तीत चूर झाले पाहिजे. बुद्धी तत्त्वचिंतनाने सर्वात्मक हवी. अहंकार ध्यानधारणेने परमेश्वरमय करावयास हवा. यामुळे कीटभ्रमरवत् ध्यान जमते; प्रत्याहारयुक्त चिंतन केल्याने सविकल्प समाधीपर्यंत जाता येते. प्रत्याहार व सोऽहं जपाने विश्वात्मकता येते. प्रवाहवत् चिंतनाने सविकल्प समाधी निर्विकल्प बनू शकते. वृत्ती मदाकार होते. मन शांत होते व चित्त निर्वात दीपाप्रमाणे रहाते. सगुणरूप ध्यान यास उपयोगी पडते. विष्णुध्यानाने चंचल मन ताब्यात येते. नाहीतर चिदाकाशात ॐकारातील अर्धमात्रेचे (अलख निरंजनाचे) ध्यान करावे.

**श्री दत्तात्रेय :** श्री दत्तात्रेय **''त्रिपुररहस्या''**त संकल्प आवरण्यास सांगतात. मन निःसंकल्प हवे. स्वरुपावर स्थिर व्हावे. त्या अवस्थेचे स्मरणही पुरे. सुप्त स्वानंद हा संकल्प, विचार, वासना, पूर्वग्रह यांनी अडतो. संविद म्हणजे जाणीव (consciousness) ही ज्ञानकला आकार जाणते. स्वतःला जाणीत नाही. आपण मन, प्राण, देह नाही ; नित्य आहोत, हे संवित् जाणते. परमेश्वर धारणेने ही संविद तदाकार होते. ही धारणा समापत्ती व मानसपूजेने अनुभवास येते. जागृतीत संकल्प बंद पाडणे, ही क्षणसमाधी आहे. विमर्शाचा नाश ही सविकल्प समाधी होय! बाह्य सर्व अंतर्धान होणे, ही निर्विकल्प प्रकाश अवस्था आहे. स्वप्न, जागृती सुषुप्ति यांच्या सीमेवरही समाधी प्रगट होते. संकल्पहीनता हाच मोक्ष होय! शरीराला, मनाला चालविणारी चितीशक्ती हीच संविद वा त्रिपुरा शक्ती आहे. संकल्पनाशाने ती मोक्ष मिळवून देते. शुद्ध परमसंविद हाच परमानंद वा मोक्ष आहे.

'जाबालोपनिषदा'त् दत्त सांकृती या शिष्याला योगाचा उपदेश करतात. प्रणवाने अपानवायु वर ओढावयास सांगतात. प्रणव व बिंदूसह प्राण वर न्यावा. सोऽहं अंगठ्यापासून शिरापर्यंत चढवून प्रत्याहार करावा. शिवाचे महदाकाशात ध्यान करावे. समाधीपर्यंत जावे. परशुरामाला दत्त सांगतात की, संकल्परुप चितीचा संकोच करावा. चेत्याचा (ईश्वराचा) प्रत्यय येतो. निर्विकार निःसंकल्प स्थितीस त्रिपुरादेवीची कृपा हवी. चंचल चिती म्हणजे मन, निश्चल चिती म्हणजे आत्मा व शिवात्मक चिती म्हणजे परमात्मा. दत्त हे अलर्कास सांगतात की, वैराग्य व अभ्यासाने मनाचा लय होतो. सगुणध्यानाने निर्गुणाचा लाभ होतो. उदासीन, निरहंकार, अपरिग्रही वृत्तीने अर्धपोटी जेवून रहावे व ध्यानाभ्यास करावा. यदू व प्रल्हादासही दत्तांनी देहात्मबुद्धी सोडल्यास आत्मवस्तूचे सुख कळते, असे सांगितले आहे. वासनानाश व गुरुकृपा ही दोन द्वारे मुक्तीची आहेत. गुरुकृपायुक्त सोऽहं हा इतर जपाप्रमाणे खालच्या चक्रावर न होता वर कंठावरील महदाकाशात होतो. अजपाजप बनून सहजपणे होतो. स्थूलाहून वेगळे होत होत आपणाला निरालंब चैतन्य हे कळते. कल्पना थांबते. शुद्ध संवित् (जाणीव) प्रकाशते. व्यापक सोऽहं विश्वात्मक जाणीव देतो. सृष्टीशी समरसता येते. आत्मा परमात्मा सुसंवाद साधतो. हृदयात प्राण एकवटून सोऽहंसह वर चढवावे. हृदयात जीवदशा असते. प्राणासह सोऽहं भ्रूमध्यावर शिवनेत्र देतो. ब्रह्मरंध्रावर शिवदशा देतो.

श्री साईबाबा ज्यास शुभ्रमार्ग म्हणत किंवा ज्याला साधु संत देवयान पंथ म्हणतात, त्यात उद्धवगीतेत सांगितल्याप्रमाणे हृदयध्यान करतात. हृदयात सगुण मूर्तीचे ध्यान केल्यास मन नष्ट होते व ज्योत प्रगटते. येथे मानसपूजेप्रमाणे दहराकाशांत देवाशी संपर्क ठेवून बोलताही येते. आत्मा प्रत्यक्ष गोचर होताना अंगुष्टमात्र वा ज्योतीरुप दिसतो. या ज्योतीकडून, हृदयाकडून वर सहस्त्रदलाकडे ब्रह्मांडाच्या चित् सूर्याकडे जायचे असते. या पंथास प्रकाशपंथ वा देवयानपंथ म्हणतात. प्राण सहस्त्रदलापर्यंत गेल्यावर मूळ मायेचे ब्रह्मरंध्राजवळ बिंदूरुप दिसते. येथे सृष्टीचा आरंभ बिंदू आहे. येथे स्फुरणाची प्रवृत्ती आहे. त्यापलीकडे परमात्मा हा आहे. भक्तीने हृदयातून कंठाकडे, कंठाकडून सोऽहं ते आज्ञाचक्राकडे व ज्ञानाने ब्रह्मरंध्राकडे जातात. गगनात गगन लयावरून कृपामार्गाने पश्चिमेकडून वर जाता येते. देवयानमार्गाने या देही मुक्ती मिळते. (पितृयानमार्ग मरणोत्तर कर्ममुक्ति देतो.)

**महर्षी अरविंद घोष :** अस्तित्व हे प्रकृतीची यंत्रणा नसून आत्म्याचा आविष्कार आहे. आपण तटस्थ कर्मे पाहा. प्रकृती स्वतःच कर्मे करील, आपण वेगळे राहू. प्रेम व पूजा ही भावना कर्म व ज्ञानात मिळवा. ईश्वर प्रेमाने अंतरी भिजावे. एक दिव्य अस्तित्व तुमच्या शरीर मनाचा तावा घेऊन तुमची जाणीव परमेश्वराशी

जोडील. सुपर माईंड(विश्वमन)चाच व्यक्तिमन हा एक खालच्या पातळीवरील अविष्कार समजतात. मनाला उच्च पातळीवर चढवणे, ही वैयक्तिक साधना, तर विश्वमनाला व्यवहारात आणणे, ही विश्वकल्याणाची साधना होय.

**ज्ञानेश्वर, सत्यसाईबाबा व आर्वीकर महाराज :** सत्यसाईबाबा यांची ज्ञानवाहिनी, प्रेमवाहिनी, प्रशांतिवाहिनी इत्यादी साधनेवरील पुस्तके प्रसिद्ध आहेत. यात साधकांना उपयुक्त मार्गदर्शन, चिंतन करण्याइतके सुंदर आहे. प्रपंचाचा हेतू मानवाचा भ्रमनिरास व्हावा, हाच आहे. सुख आतच शोधावे लागते. मन हे इच्छांचे गाठोडे आहे. सर्वसंकल्प त्यागून स्थिर रहा. जगाला चिकटू नका. श्री बाबांनी प्रेमवाहिनी, ज्ञानवाहिनी, ध्यानवाहिनी, प्रशांतिवाहिनी इत्यादी लिहिलेली अमोल पुस्तके, श्री आर्वीकरांचे ज्ञानेश्वरीच्या १२व्या अध्यायावरील ''दिव्यामृतधारा'' हा दिव्य ग्रंथ व ज्ञानेश्वरांच्या भाष्यावर वेगवेगळ्या विद्वानांनी केलेले विवेचन इत्यादींच्या आधारे यापुढील लेखांत साधनामार्गावरील प्रसुत लेखकाचे स्वत:चे मनोगत मांडण्याचा संकल्प आहे. भक्त व साधकांनी यापुढील लेख फार अभ्यासपूर्ण मनाने मनन व चिंतन करावेत, अशी त्यांना विनम्र प्रार्थना आहे.

---

**तत्वाहुन थोरी सखया आचाराची**
**ज्यातून विकासे वेल बंध मोक्षाची**
**तू जोड संपदा जीवनांत सुगुणांची**
**त्यागून आसुरी संगत आसक्तींची**

**तू क्षमावान हो, शांतिब्रह्म, मृदुभाषी**
**सत्यास न सांडी नित्य जोडि त्यागासी**
**आसुरी नको ते दंभ, लोभ, उन्माद**
**नित स्मरण स्वरूपी फुलो नित्य आनंद**

**कर्तव्य कोठले, त्याज्य कोठले कर्म**
**तू जाण तयाचे ज्ञानदृष्टीने मर्म**
**'तामसी, राजसी नको व्रते, तप, ज्ञाने**
**आहार विहारा खुलव सत्वतेजाने.**

**- गीता**

---

# श्री साईंचे शिरडीला पुनरागमन

वृत्त-मंदाक्रांता : बाबा आले तरुणपणि जैं शैलधीला[१] स्वयेंची।
कोणा ठावे कुठुनि, अथवा काय जाती तयांची॥
सोडोनीया शिरडि निघती ज्ञात ना ते कुणाते।
शोधीयेले बहुत तरिही लाभले ना कुणाते॥१॥

शिखरिणी : कुणी झाले कष्टी कळत जव साई विलिन ते।
'जसा आला तैसा' वदत कुणि 'गेला समजते'॥
इया गोष्टीलागी सतत सरली आठ वरिसे।
पुढे ऐका कैसी शिरडि वरती प्रीत बरसे॥२॥

वसंततिलका : औरंगबाद-निकटीवरि खेड 'धूप'[२]।
पाटील 'चांद' तिथला सगुणी अमूप॥
औरंगबादि असता बहु काम त्यांही।
घोडी पळालि न मिळे बघता कुठेही॥३॥

भुजंगप्रयात : अती दुःख झाले तया पाटलाला।
तरी गावि जाण्यास पायी निघाला॥
स्वये पाठिसी खोगिरा बांधियेले।
उन्हाने धुळीने तया त्रस्त केले॥४॥

शार्दूलविक्रीडित : कानी हाक पडे अचानकपणे, पाही वळोनी तिथे।
देखे एक फकीर होत बसला आंब्यातळी शांतते॥
तेजःपुंज, तसा तरुण, कफनी, टोपी शिरी धारिली।
"विश्रांतीस जरा बसा" म्हणत तो "वृक्षा-तळी साउली"॥५॥

शार्दूलविक्रीडित : पाटीलास पुसे फकीर "कवण्या गावी निघाले असे?।
खोगीरासचि बांधुनी, लगबगे, पाठीवरी ते कसे?"॥
सांगे चांद तया प्रकार मग तो साद्यंत जैसा घडे।
दुःखी फार मनी "बघा हरवली घोडी, न ती सापडे"॥६॥

पृथ्वी : "उगाच करिसी असा गलबला, मिळे घोडि ती।
जरा पलिकडे चरे सहज कुंपणाआड ती"॥
वदे फकिर पाटला, भरवसा नसे त्या[३] मनी।
तरीहि बघणे चि योग्य समजोनि जाई झणी॥७॥

शालिनी: आश्चर्याने गांजले पाटलाला।
आनंदाने आणिले घोडियेला॥
बांधोनीया तीजला ओढक्याला।
विश्रांतीला पातला साउलीला॥८॥

(१-शिरडीला २-धूप नावाचे खेडे ३-चांद हे पाटलाचे नाव ४-पाटलाच्या)

हरिणी: फकिर वदला त्यासी, "आता चिलीम भरूनिया।
बसुनि जवळी गप्पा मारू, मजा मग लूटुया"॥
"तरण नसता छापी ओली तरी कशि होईल?।
अनिल नसता पेटे कैसी?' म्हणे मनि पाटिल॥९॥

स्वागता: बोलणार इतुक्यातच पाही।
'हा मनुष्य नच, देव तरीही,॥
वा कुणी असत योगि महान।
भेटला मजसि योग महान'॥१०॥

तोटक: सटका वरती करूनि हाणिला।
धरणी मधुनी झरणा फुटला॥
चिमटा वरती करूनि हाणिला।
जळता अग्नी चिमटीं धरिला॥११॥

मंदाक्रांता: अंगारा त्या चिलमि वरती ठेविला एक हातें।
छापीलाही चिलमि भवती वेष्टिले एक हातें॥
पीवोनीया दिधलि मग ती पाटिला ओढण्याला।
आश्चर्याने वदत मनि तों "सौख्य-साठा मिळाला"॥१२॥

शिखरिणी: बहू आश्चर्याने नमन करूनी प्रार्थि फकिरा।
"तुम्हा जैसे साधू मम-सदनि यावे घडिभरा॥
अशी इच्छा माझी, पद-धुळिसि लावा ममघरा।
शुभाशीर्वादि कीं त्वरित मम उद्धारचि करा"॥१३॥

द्रुतविलास: सदय-भाव मनी अति दाटला।
उठत तों निघण्या सह-पाटला॥
उठुनिया मग बोलत चालले।
त्वरित ते सदनाप्रति पातले॥१४॥

भु. प्र. : फकीरास लागे प्रिती पाटलाची।
तशी आवडी पाटिलालाहि त्याची[३] ॥
वसे साधु तेथे घरी पाटलाच्या।
कशी सांगु मी मौज गप्पात त्यांच्या ॥१५॥

(१-पाटील २-फकीर ३-फकिराची)

हरिणी : उपवधु असे भाचा त्याचा[१] गुणी, अन गोडसा।
सुशिल वधुतें शोधायाला सुरू करि तो[२] कसा॥
स्थळ गवसले तेही भाग्यें तया शिरडीप्रती।
मळवट चढे सौभाग्याचे अहा! शिरडीप्रती ॥१६॥

इंद्रव्रजा : 'न्यावे फकीरा', मनि पाटिलाच्या।
नमूनि सांगे पदिं तो तयाच्या[३] ॥
होकार दिधला फकिरें तयासी।
वऱ्हाड चाले मग शैलधीसी[४] ॥१७॥

शा. वि. : शिर्डीमाजि जयीं वऱ्हाड उतरे गाड्या खळीं सोडुनी।
शिर्डीवासि जनांनि 'तोंच' म्हणुनी जाणीयला पाहुनी॥
"या साई" म्हणुनी करीत सगळे आनंदुनी स्वागता।
तेव्हांपासुनि नाम ते पडतसे 'साई' असे तत्वता ॥१८॥

पृथ्वी : वऱ्हाड अवघे निघे उरकुनी विवाहा जयीं।
नसे; मनसि साइच्या परतणे, न जाई तयीं॥
मशीदित कधी, कधी निजत देउळी-मारुती।
पुढे सतत शीरडी वसत तें[६] समाधी-प्रती ॥१९॥

मालिनी : प्रथम वसत प्रीती देवदासावरी ती।
नियमित शयना तो[७] येइ साई-समेती॥
द्वितिय जडत मैत्री जानकीदास भक्तीं।
इतर बहुत येती-जाति आणीक व्यक्ती ॥२०॥

मु. प्र. : स्वयें लावुनी रोपटी, पाणि घाली।

कशी ती पहा छानशी बाग झाली॥
मिळाले सु-सौभाग्य या शीरडीला।
सर्वे शीरडीच्याहि साऱ्या जनांला॥२१॥

(१-पाटलाचा २-पाटिल ३-फकिराच्या ४-शिरडीला ५-खळग्यात ६-श्री साई ७-देवदास ८-सहित)

- श्री. वि. कृ. सहस्रबुद्धे

## साईंचा आधार !

शिर्डी गावी उभे मंदीर
विराजमान श्री साई सिंहासनावर
मुकुट सुंदर शोभे डोईवर
भगवा सदरा हात मांडीवर
रोज पहाटे काकड आरती
भक्त आरतीला खडे राहती
हाती घेऊनी हार फळे उपायन
मुखाने गातात साईगीतायन
साईनामी होई जीवाचे सार्थक
साईलीलाचा आनंद सात्विक
करिता सेवा दूर होती व्याधी
सर्वांचा आधार साईंची समाधी

- शंकरानंद
ताडदेव, मुंबई.

# आळवणी

प्रभो साईनाथा, कुठे पाहू तुला?
बघ मायाजाली जीव हा भुलला
ज्ञान न मजला मार्ग बुरा-भला
अज्ञान अंधार जगीं पसरला॥१॥

तुजवीण नसे त्राता कुणी मजला
ठेंचाळतो आहे पावला पावला
ज्ञानदीप तुचि दाखवी मजला
टेकू देत माथा तव चरणाला॥२॥

दर्शन तृष्णा ही लागे नयनाला
दर्शन दे प्रभो युगांच्या पाप्याला
उपासना विधी ठाऊक न मला
जाण एक माझ्या भोळ्याचि भक्तीला॥३॥

**- श्री. बाबू फिलीप डिसोजा**
लोणावळा, पुणे.

# साई दर्शन दे आता

साई, दर्शन दे आता
भवतापीं मी तापून गेलो, शितल कर नाथा
साई, साई दर्शन दे आता
राम-कृष्ण तू, तू सर्वेश्वर
ईश्वर, अल्ला, तू परमेश्वर
भावभक्तीने धावून येशी, तव कवने गाता
साई दर्शन दे आता
साई कृपेची असता छाया
तरुन जाईन संसारा या
सकलांचा तू भाग्यविधाता अन् एकच त्राता
साई दर्शन दे आता

**- श्री. महेश सी. ठाकूर**
नागोठणे, रायगड.

# हीच इच्छा मानसी

ज्या मनी जो भाव जैसा। पावशी तू त्यासी तैसा।
उक्तीच्या या तुझ्या भरोसा। साईभक्तां येऊ दे।।१।।

लागू दे रे तुझ्या कीर्तनी। चित्त तुझ्या पूजनी।
जाऊ दे मन गुंगुनी। मूर्ती तुझी पाहता।।२।।

छंद लागो भक्तिचा। भाव तुझिया प्रीतिचा।
मेघ वर्षो शांतीचा। चित्त लागो त्वत्पदी।।३।।

सावरा हे चित्त साई। शांतस्थिर लव होत नाही।
चिंतिते जे काहीबाही। वायुपरी हे चंचल।।४।।

ध्यान लावाया मनी। नेत्र घेतो झाकूनी।
घोर चिंता त्या क्षणी। फेर धरुनी नाचती।।५।।

वाचतो तव ग्रंथि चरित। लव न चित्ता या उसंत।
भाग्योदयाची करीत खंत। चित्त विचलित होतसे।।६।।

आरतीचे तबक हाती। पाजळोनी लख्ख ज्योती।
ओठ जरी भावार्ती गाती। चित्त हे भलतीकडे।।७।।

हे कसे बघ दांडगे। ऐसे कसे हे कोडगे?।
वागे असे का वावगे?। तूच याला शुद्धी दे।।८।।

भ्रांती याची दूर जावो। प्रेम याचा भाव राहो।
भान याचे नष्ट होवो। साई तुझ्या कीर्तनी।।९।।

एवढी करुणा करी। चित्तवृत्ती सावरी।
नित्य माझ्या अंतरी। एक मूर्ती हो तुझी।।१०।।

साई भक्ता हात द्या। आपुली नित साथ द्या।
नित्य सेवा करुनी घ्या। हीच इच्छा मानसी।।११।।

- श्री. शंकर इनामदार
जुन्नर, पुणे.

# साई-कृपा

प्रात: समयी समाधीतून। नवा घुमे ओंकार
सद्‌गुरु महिमा अपरंपार। साई तव प्रीतीचा झंकार।।धृ।।

आत्मबळाच्या मंडळातूनी। तेजोवलये प्रभा फाकिती
भक्तगणांच्या हृदयी शिरता। रंग तरंग अपार
साई तव प्रीतिचा झंकार।।१।।

मूर्तिमंत ती सजीव प्रतिमा। अबोल बनुनी पाही सर्वथा
मनोगतातुनी जाणूनी घेई। भक्तगणांचे सार
साई तव प्रीतिचा झंकार।।२।।

सात समुद्रा पार करुनी। मनोमनी तू वससी निशिदिनी
प्रेम रज्जूनी बांधुनी त्याते। दाविसी मंदिरद्वार
साई तव प्रीतिचा झंकार।।३।।

धूप दीप नैवैद्य अर्पुनी। पूजेमधुनी भक्ती समर्पुनी
स्वल्प मागता मिळे सर्वथा। स्वर्ग सुखाचे सार
साई तव प्रीतीचा झंकार।।४।।

**- श्री. अ. द. जवळकर**
अहमदनगर.

— ◆ —

# प्रार्थना

हे स्वामी, माझी तुझ्याजवळ एवढीच प्रार्थना आहे की
माझ्या हृदयातील दारिद्र्यावर मुळाशीच घाव घाल, ते नष्ट कर
माझी सुखदु:खे सहज भोगण्यास मला सामर्थ्य दे
गरीब दुबळ्यांचा तिरस्कार करु नये
गर्विष्ठ सबलांपुढे मान वाकवू नये
असे वागण्यास मला सामर्थ्य दे
रोजच्या संसारातल्या भिक्कार जंजाळात गुंतून न राहता
काहीतरी उन्नत विचारात माझे मन गुंतविण्याचे सामर्थ्य दे
आणि हे सामर्थ्य भक्ती पुरस्सर तुझ्या इच्छेप्रमाणेच कामी लावण्याचे
बळ दे

मला श्री, यश, विद्या, विनय यांचा लाभ होऊ दे
आतापर्यंत साईबाबांनी खूप काही चांगले दिले
चार वेळा माझ्यावर निर्वाणीचे प्रसंग आले
श्री बाबांच्या कृपेने मला वाचविले
आता नंतरही बाबांनी माझ्या हातून चांगले काही करवून घ्यावे
आतापर्यंत बऱ्याच चुका झाल्या, प्रत्येक वेळा बाबा त्यातून मार्ग दावीत आले
अनेक वेळा संकटे आली, बाबांनी अतर्क्य मार्गांनी मला सोडविले
कधी एखाद्या घटनेच्या रुपात
कधी एखाद्या व्यक्तीच्या रुपात
साईबाबा प्रगट झाले
ज्या काही चांगल्या गोष्टी आहेत, त्या बाबा करुन घेतीलच
बाबा मला नेहमी जीवनाचा प्रकाश मार्ग दाखवा
खरी मन:शांती मिळेल अशा निर्मळ मार्गावर उभे करा

- **श्री. रामचंद्र ध. गोळेकर**
दादर (प.), मुंबई.

—◆—

**श्रद्धाहि फुलावी सात्विक आयुष्यात**
**अस्तित्व बुडावे नित्य भक्ति रंगात**
**सत्कर्म घडावे असत् नाश पावावे**
**प्रारब्ध सरावे, संचित लव न उरावे**

**- गीता**

# मानवी-जीवन

माणुस येतो तसाचि जातो
कुणास ठावुक कोठे।
मागे ठेवुनि फुका पसारा
आणिक सारे नाते॥१॥

कोण स्वत: हे कधी न कळले
खावुनि खस्ता-गोते।
अंगी घेतला भरूनि ताठा
अन् लोभाचे साठे॥२॥

डोळ्यादेखत जरी पाहिले
सरून जाती चहाते।
परि न त्याने धडे घेतले
शुद्ध करूनि बुद्धीते॥३॥

स्वार्थापायी वणवण फिरला
पायी टोचले काटे।
संसारातिल भोग भोगुनी
गेला आल्या वाटे॥४॥

जीवन हे तर असे खरोखरी
दळणारे जाते।
पाप भरडुनि जाता उरते
पुण्याचे पोते॥५॥

- श्री. शाम पु. जुवळे
दादर (प.), मुंबई.

# श्री. माधवराव बळवंत (बाबांचा शाम्या) देशपांडे शिरडीकर यांचे अल्प चरित्र

**(श्री साईलीला, शके १९६२ कार्तिक अंकावरुन)**

(मागील अंकावरुन पुढे चालू)

त्याचप्रमाणे एकदा माधवरावांनी बाबांना विचारले की देवा, ह्या गणपतराव नरक्यांना नोकरी कुठं मिळेल रे? बाबा म्हणाले 'श्याम्या आपल्याला पुण्यातच राहावयाचे आहे. दुसरीकडे कोठेहि जावयाचे नाही.' यावरून माधवरावांनी अजमास केला की, गणपतराव यांना पुण्यासच कायमची नोकरी मिळणार. पुढे एक वेळ ब्रह्मदेशात तात्पुरती नोकरी मिळण्याचा प्रसंग आला होता. तेव्हा डॉ. पिल्ले यांनी बाबांना विचारले, बाबा, ब्रह्मदेशची नोकरी चांगली आहे ना? हे तेथे कायम होतील ना! बाबा म्हणाले, 'होय' ही गोष्ट गणपतरावांनी माधवरावांस सांगितली. सर्वांना या बोलण्याचे आश्चर्य वाटले की, हे काय, बाबा एकाजवळ एक बोलतात, व दुसऱ्याजवळ दुसरेच बोलतात. माधवराव पुन्हा प्रोफेसर साहेबांना (श्री. गणपतराव नरके) बाबांकडे घेऊन गेले व म्हणाले, 'काय रे देवा, कोणतं खरं? त्वां मला सांगितलेलं ते खरं का भाऊला (डॉ. पिल्ले) सांगितलेलं खरं?' बाबा म्हणाले, 'तुला सांगितलेलं खरं' डॉ. पिल्ल्यांनी पुन्हा हसत हसत विचारले, 'बाबा, मला सांगितलेलं खरं की आता माधवरावांना सांगितलेलं खरं?' बाबा म्हणाले, 'शाम्याला सांगितलेलं खरं' शेवटी तेच खरं झाले.

एकदा माधवरावांनी बाबांजवळ प्रश्न काढला की, काय रे देवा, रामायणात लिहिलं आहे की रामांनी रावणाबरोबर लढाई करायच्यावेळी समुद्रावर पूल बांधला. तेव्हा रामांनी तिथं एक कोटि वानरसैन्य जमा केलं होतं. देवा, हे खरं काय रे? देवा राम, खरं काय रे? बाबा म्हणाले, 'श्याम्या, हे समदं खरं आहे बरं का. रामहि खरे आहेत बरं.' माधवराव म्हणाले, 'देवा, हे एक कोटि वानर कुठं व कसे बसले होते रे?' बाबा म्हणाले, 'ते समदे वान्नेर झाडांवर मुंग्यावाणी बसले होते बरं का शाम्या.' माधवराव म्हणाले, 'देवा, हे त्वां डोळ्यानं पाहिलं कां रे?' बाबा म्हणाले,

'हो हो म्यां डोळ्यानं पाहिले बरं का शाम्या.' माधवराव म्हणाले, 'देवा, तुझी ही लोनकडी थाप आहे. देवा, तू तर माझ्या समक्ष इथं आलास तेव्हा तुला मिसुरडंहि फुटलं नव्हतं. अन् मग तू ते वाण्णेर केव्हा रे बघायला गेला होतास?' बाबा म्हणाले, 'शाम्या, तुझ्या व माझ्या फार पिढ्या झाल्या. त्या समद्याचा मला आठव आहे आणि तुला नाही.' माधवरावांनी विचारले, 'देवा, तू तेव्हा केव्हढा होतास रे?' बाबा म्हणाले, 'आता आहे एव्हढाच शाम्या.' माधवराव म्हणाले, 'देवा, हे खरं काय रे?' बाबा म्हणाले, 'शाम्या, मी मशिदीत बसून खोटं बोलतो का रे? शाम्या, मी खोटं नाही बोलत बरं.' माधवराव म्हणाले, 'देवा, तू इतका पुराना आहे का रे?' 'होय. यात काही खोटं नाही. तुझी शपथ शाम्या.' बाबा म्हणाले, 'एकदा परमात्म्यांनीसुद्धा असेच अर्जुनाजवळ म्हणून शपथ वाहिली.'

''यथा बोला माझारी। होय नव्हे ञणें करी॥
येथ आन आथी तरी। तुझीच आण॥१३८॥ श्री. ज्ञा. अ. १८

## देवाची हजेरी

बाबा जसे तात्या पाटील, बडेबाबा, रामचंद्र पाटील, बयाजी पाटील वगैरे भक्तांना रोज पैसे देत तसे माधवरावांना ते कधीही देत नसत. माधवराव सर्व भक्तांमध्ये बाबांचे फार लाडके व फार बोलके. ते एकदा बाबांना म्हणाले, 'देवा, तू तर फार उदार आहेस, असे लोक म्हणतात. तू कोणाला जमीन जुमला देतोस, कुणाला बायको, कुणाला पोर देतोस, कुणाला इद्या, कुणाला पैका देतोस. आन् आम्ही तुझ्या पायाजवळ नेहमी राहून नेहमी आपत्ति भोगितो. तमाखु पियाला सुद्धा तू कधी आम्हाला दिडकी दुगानी देत नाहीस. हे असं कसं रे देवा? मी तर म्हणतो, 'तुझ्यासारखा खटचाळ आन् भिकारडा देव साऱ्या दुनियेत नाही. डोइला फडकं गुंडाळतोस. मशिदीत झगरं पेटवून बसतोस. चिलीम फुंकितोस. आन् गावात तुकडं मागून आणून खातोस. तू रे काय आम्हाला देणार? मला तर वाटतं, तू मोठा कृपण नि करंटा आहेस देवा! तू देव देव म्हणून मिरवितोस. तुला देव कुणी रे केला देवा? अरे, तुला देव आम्हीच केला. नाही तर तुला भिकमाग्या फकिरड्याला इचारीत कोण होतं रे?' माधवराव कसेही बोलले तरी बाबांना त्याचे कौतुकच वाटे. बाबा म्हणाले, 'पैसा अडका तुझ्याकरता नाही बरं का शाम्या. तुझ्याकरता न्यारंच आहे.' माधवराव खूण समजले व गप बसले.

## देवाची खरडपट्टी

एकदा माधवरावांचे डोळे आले, सुजले व त्यांना खूप ठणका लागला.

माधवरावांनी पुष्कळ औषधोपचार केले पण कशाने गुण येईना. शेवटी संतापून रागावून बाबांकडे गेले. बाबांनी विचारले, 'काय शाम्या, कसं काय आहे?' माधवराव कातावून म्हणाले, 'देवा, तुझ्यासारखा दुष्ट, नष्ट, खटचाळ देव कुणी नाही. लोकांना दवा देतोस, त्यांच्या याधी नाहिशा करितोस आन माझे डोळे सुजून इतका ठणका लागला आहे, की मी आजसारखा दोन-चार दिवस ठण-ठण-ठण बोंबा मारितो, आरडतो, ओरडतो; तुला लाज नाही वाटत का रे? अरे, तू काय आंधळा झालास का बहिरा झालास? अरे, तुझे डोळे नि कान का फुटले का काय? अरे, तुला दिसत कसं नाही आन ऐकायला पण कसं येत नाही? असला कसला तू देव? बघ देवा जर का माझे डोळे उद्या सकाळी बरे नाही झाले तर तुला मशिदीतून हाकलून लावीन; तरच मी नावाचा शाम्या.' बाबा म्हणाले, 'उगाच वटवट करू नको शाम्या. सात मिऱ्याचे दाणे पाण्यात उगाळ, आणि दे डोळ्यांत घालून, म्हणजे बघ तुझे डोळे भिंगावाणी होतील. जाय, जाय, उठ, घे उदी.'

माधवराव खूप संतापून म्हणाले, 'देवा, तू तर फारच शहाणा दिसतोस रे! अरे, ही वैदगिरी तू कुठं रे शिकला देवा? मिरे वाटून डोळ्यांत वाटून घेऊन मी आपले डोळे फोडून घेऊ होय? चांगली आहे तुझी वैदगिरी लोकांची डोळे फोडण्याची बुवा.' बाबा शांतपणाने म्हणाले, 'जाय जाय आता फार शहाणपणा नको करू, अगोदर करून पहा अन् मग डोळे नाही बरे झाले तर रागाव.'

माधवराव जरी असे बोलत तरी बाबांचे शब्दावर त्यांचा पूर्ण भरवंसा असे. माधवरावांनी त्याप्रमाणे केले व त्यांचे डोळे तावडतोब खडखडीत बरे झाले.

---

सुगुणांची संगत सलोक मुक्ती देते
प्रभु समीपता शुभ आचारातून फुलते
प्रारब्ध, देह अन् कर्म, इंद्रिये, जीव
या पांच प्रेरणा बद्ध करिती आजीव

तू मुक्त रहावे बंधातुन या नित्य
मत्शरण-समर्पण भाव दाखवी सत्य
स्मर अखंड मजला, बुडव चित्त माझ्यात
मी तुजला अर्पिन सायुज्याचा प्रांत

- गीता

---

## ग्रंथ परिचय

# श्री दत्तगुरुंची प्रवचने

श्री दत्तमहाराजांनी काही सूचना केल्या या श्रद्धाभावाने श्री. भरतकुमार देसाई यांनी नामस्मरणाच्या क्रियेबद्दल व महत्वाबद्दल लिहिलेल्या स्फुट टिपणांचा हा संग्रह आहे. नामस्मरणाबद्दल पू. काका कुंटे यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा ही टिपणे पडसाद आहेत, असा भास होतो. लेखकाने (टिपणीकाराने) नामस्मरणाच्या महत्वावर भाष्य करताना व्यावहारिक व भक्तिमार्गीय शहाणपणाचे बोल गुंफलेले आहेत. सोपी, सुबोध भाषा यांमुळे ही प्रवचने वाचनीय झाली आहेत, यात शंका नाही; परंतु प्रभूदत्तात्रेयांनी काही भक्ती वा ज्ञानगुह्य यांत टिपणीकारांना सांगितले आहे, असे म्हणवत नाही; कारण हे योगेश्वरांकडून आलेले गुह्य नसून श्री. देसाई यांच्या श्रद्धावान् व भाविक मनात आपल्या मार्गदर्शक कुंटेकाकांच्या शिकवणीतून झरलेले नामसाधनेबद्दलचे विचारांचे प्रतिबिंब आहे.

श्री गुरुदत्त हे योगेश्वर आहेत; ते केवळ नामस्मरणाची साधना सांगून थांबणारे नाहीत, तर सर्व मार्गांचा श्री दत्त हा समन्वय वा संगम आहे, याची जाण या प्रवचनांत कुठे दिसत नाही. श्री दत्तांचे नामही योगपर आहे व योगशक्तीत विलीन होणारे आहे, हे गुह्य यांत मांडलेले नाही. यामुळे ही प्रवचने भरतकुमारांच्या मनातील दत्त प्रतिबिंबाचीच भासतात. तथापि, प्रयत्न स्तुत्य आहे. पुस्तकाची छपाई फारच सुंदर, सुबक व मुद्रण अगदी आदर्श झाले आहे. याबद्दल श्री. राजेंद्र वड्थ्याल (शर्मा), श्री. मुरली व श्री. प्रताप कामत यांचेही अभिनंदन करावेसे वाटते.

श्री. भरतकुमार देसाई यांना "श्री साईलीले"च्या शुभकामना. चित्रकाराने काढलेली दत्तांची मूर्ती बाल असली, तरी चेहरा प्रौढ व वयस्कर वाटतो.

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | श्री दत्तगुरुंची प्रवचने |
| संग्राहक | : | श्री. भरतकुमार देसाई |
| पृष्ठे | : | ११२ |
| प्रकाशिका | : | सौ. गीता गोविंद कुंटे,<br>दुर्गा स्मृती (पराडकर बिल्डिंग), ब्लॉक नं. ५,<br>गावंडे विंझे रोड-२, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१. |
| मुद्रक | : | उमा ऑफसेट, ए टू झेड इंडस्ट्रियल इस्टेट, मुंबई. |
| मूल्य | : | रु. २५/- |